# साहित्यिक रमेश धनावडे यांच्या ‘नादखुळा’ या पुस्तकाचे प्रकाशन!



अलिबाग: सुप्रसिद्ध साहित्यिक रायगड भूषण रमेश धनावडे यांच्या 'नादखुळा' या सहाव्या पुस्तकाचे नुकतेच प्रकाशन झाले. यावेळी माजी नगराध्यक्ष अलिबाग प्रशांत नाईक, ऍडवोकेट प्रसाद पाटील, कामगार नेते दीपक रानवडे, डॉक्टर चंद्रकांत वाजे, डॉक्टर राजेंद्र चांदोरकर, सुप्रसिद्ध उद्योगपती अनिल म्हात्रे, चित्रपट निर्माते दिग्दर्शक लेखक नरेंद्र ठाकूर, रायगड जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ऍडवोकेट व साहित्यिक विलास नाईक, साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे, पूनम रमेश धनावडे, महेश कवळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. साहित्यसंपदा प्रकाशनतर्फे हे पुस्तक प्रकाशित झाले असून साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी रमेश धनावडे यांच्या काही निवडक कवितांचे वाचन किरण साष्टे व ज्योती बावधनकर यांनी खुमासदार पद्धतीने केले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमासाठी काही शुभेच्छापत्र आली होती त्याचे वाचन वैशाली भिडे यांनी खूप छान पद्धतीने केले. यावेळी उपस्थित मान्यवर पाहुण्यांनी भाषणे झाली यात रमेश धनावडे यांच्या सामाजिक, साहित्यिक व इतर कार्याचा आढावा घेतला गेला. तसेच ते सातत्याने करत असलेल्या लिखाणाबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन व कौतुक करण्यात आले. प्रभाकर धनावडे यांनी या पुस्तकास शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना रमेश धनावडे यांनी नादखुळा पुस्तकाचा प्रवास थोडक्यात कथन गेला. तसेच या पुस्तकासाठी नादखुळा हेच नाव का कायम केले गेले याविषयीही माहिती दिली. तसेच त्यांनी या पुस्तकातील आपल्या काही निवडक कविता गाऊन उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. ज्येष्ठ आर्टिस्ट व चित्रकार निलेश जाधव यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ तयार केले आहे. तसेच या पुस्तकासाठी प्रस्तावना व ब्लफ ज्येष्ठ साहित्यिक अशोक बागवे यांनी लिहिली आहे. पुस्तकाच्या अंतर्गत सजावटीचे काम योगेश राणे यांनी केले असून पुस्तकाचे मुद्रित शोधनाचे काम महेश कवळे यांनी खूप छान पद्धतीने केले आहे. यावेळी रमेश प्रभाकर धनावडे यांचे शिक्षण एम.कॉम., एल एल. बी., एम.बी.ए. असे झाले असून ते रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे येथे डेप्युटी जनरल मॅनेजर एच. आर. (कॉर्पोरेट अफेअर्स) म्हणून कार्यरत आहेत. आजवर त्यांचे मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह व असेच काहीतरी ही पुस्तके प्रकाशित आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कवळे यांनी अतिशय बहारदारपणे केले. तसेच या पुस्तकाचे उपस्थित सर्व मान्यवरांनी भरभरून कौतुक केले आहे. असून नादखुळा हे पुस्तक साहित्य क्षेत्रामध्ये भरपूर नावलौकिक मिळवेल असा विश्वास उपस्थित मान्यवर व साहित्य क्षेत्रातील तज्ञांनी व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अपूर्वा धनावडे, तेजल धनावडे, पार्थ पाटील, राजेश्री पाटील व इतर अनेक जणांनी खूप मेहनत घेतली. यावेळी अलिबाग तालुक्यातील व रायगड जिल्ह्यातील अनेक नामवंत साहित्यिक, सुजाण नागरिक, वाचक, साहित्यप्रेमी व रमेश धनावडे यांचा मित्रपरिवार आणि आप्तेष्ट उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिन; पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

## पनवेल शहर सुंदर बनविण्यासाठी कटिबध्द होऊया – आमदार प्रशांत ठाकूर



पनवेल: जागतिक पर्यावरणाचे जतन करण्याच्या दृष्टीने पनवेल महापालिकेने एक लक्ष वृक्षारोपणासाठी उचललेले पाऊल हे निश्चित अभिनंदनीय व पनवेलच्या सौंदर्यात भर घालणारेच आहे. त्यामुळे पनवेल शहर अधिकाधिक सुंदर व स्वच्छ बनविण्यासाठी आपण नागरिकांनीही कटिबध्द व्हावे,असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. महानगरपालिकेच्यावतीने जागतिक पर्यावरणदिनानिमित्ताने वडाळे तलावाजवळील महामार्गालगत सुमारे 40 झाडांचे रोपण करण्यात आले. तसेच कापडी पिशवी विक्री केंद्र आणि पुनर्वापर प्लास्टिक व ई वेस्ट संकलन केंद्राचे ही उद्घाटन करण्यात आले , यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना श्री.ठाकूर म्हणाले, कापडी पिशवी साठीची आधुनिक मशीन व ई-वेस्ट कचरा संकलन या महत्त्वाच्या बाबीही पनवेल मनपाने सुरू केले आहेत. त्याचा उपयोग पनवेलकरांनी अधिकाधिक करावा व पर्यावरणाचे रक्षण करावे. यावेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर,अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे,उपायुक्त सर्वश्री, डॉ.वैभव विधाते, रविकिरण घोडके, स्वरूप खारगे, परिवहन उपव्यवस्थापक अभिषेक पराडकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे,सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार , डॉ.रूपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण,मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, माजी नगरसेवक सर्वश्री नितिन पाटील, अजय बहिरा, अनिल भगत व माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, सुरेखा मोहकर, वृषाली वाघमारे, विभाग प्रमुख अनिल कोकरे,महापालिका अधिकारी ,महावीर इंटरनॅशनल संस्थेचे पदाधिकारी, निसर्गमित्र संस्थेचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

यावेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर म्हणाले, प्लास्टिकमुक्तीसाठी महापालिकेने कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसविली आहे. हा एक स्तुत्य उपक्रम आहे. या बरोबर महापालिकेने 1 लाख झाडे लावण्याचा उत्तम निर्धार केला आहे. महापालिकेने याबाबत केलेले नियोजन पहाता हा उपक्रम यशस्वीपणे राबवल्या जाईल यात शंका नाही यावेळी कापडी पिशवी विक्री मशीन व पुनर्वापर प्लास्टिक व ई वेस्ट संकलन केंद्र याबाबत उपयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सविस्तर माहिती देऊन उपस्थितांचे स्वागत केले.यावेळी पर्यावरण रक्षणाबाबत हरित शपथ घेण्यात आली.

**पर्यावरण दिनी 1100 वृक्ष लागवड**

बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार पनवेल महानगरपालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील विविध ठिकाणी एक लाखाहून अधिक झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. याची सुरूवात पर्यावरण दिनानिमित्ताने महापालिकेच्या चारही प्रभागात 1100 झाडांचे रोपण करून करण्यात आली.

यात आयटीआय कॉलेज, जेसल मेलोडी,पनवेल बसस्टॅन्ड याठिकाणी 160 वृक्षांचे रोपण करण्यात आले.

महानगरपालिका, प्रभाग समिती ब, प्रभाग क्रमांक ७ येथील सेक्टर २०, रोडपाली मैदान येथे १०० झाडे लागवड करण्यात आली. याचबरोबर खांदा कॉलनी शंकर तलाव येथे 50 झाडे, फोनिक्स बँक्वेट हॉल शेजारी 100 झाडांचे रोपण करण्यात आले.या वेळी पनवेल महानगरपालिका उपायुक्त स्वरूप खारगे , सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार ,प्रभाग समिती (ब) अधिक्षक मनोज चव्हाण , माजी नगरसेवक , नगरसेविका रोडपाली असोसिएशन , लायन्स क्लबच्या मेंबर, पर्यावरण बचाव समितीचे सदस्य, पनवेल महानगरपालिका इंजिनियर, प्रभाग समिती ब सर्व स्वच्छता निरीक्षक, कर्मचारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

**नावडे उप विभाग**

महानगरपालिकेमार्फत अमृत 2.0 आणि डे एन यु एल एम कृतीसंगम कार्यक्रमाअंतर्गत पिसार्वे तलाव येथे बचत गटातील महिलांमार्फत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी बचत गटांतील महिलांमार्फत 140 झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमासाठी उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त मंगला माळवे, उपअभियंता विलास चव्हाण , सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने , सामाजिक कार्यकर्ते रवींद्र म्हात्रे , प्रभाग अधिकारी नावडे अरविंद पाटील, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी , अधिक्षक नामदेव पिचड तसेच डे एन यु एल एम व्यवस्थापिका विनया म्हात्रे, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

**कामोठे प्रभाग (क)**

**कामोठेमधील सेक्टर 8 व सेक्टर 6 याठिकाणी उपायुक्त रविकिरण घोडके व माजी नगरसेवक यांच्या हस्ते सुमारे 140 हून अधिक झाडे लावण्यात आली.**

**खारघर प्रभाग (अ)**

**खारघरमधील सेक्टर14 व सेक्टर 30मध्ये उपायुक्त अभिषेक पराडकर व माजी नगरसेवक यांच्या हस्ते सुमारे 130 हून अधिक झाडे लावण्यात आली. खारघरमधील विविध उद्यानांमध्ये50 व तळोजा मधील गणेश विसर्जन घाट येथे 50,सिडको कार्यालयाजवळ 40 वृक्ष लागवड करण्यात आली.**

# जागतिक वृक्षारोपण निमित्ताने पन्हळघर खुर्द येथे वृक्षारोपण



माणगाव: माणगाव तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायत पन्हळघर खुर्द येथे जागतिक वृक्षारोपण दिनाच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे नेतृत्व सरपंच हारदास शेडगे, उपसरपंच रमेश जाधव, ग्रामसेविका नागे मॅडम यांनी केले. ग्रामस्थांच्या सहभागामुळे वृक्षारोपण कार्यक्रम अधिक प्रभावी झाले. या प्रसंगी गावच्या अंगणवाडी सेविका भावना बामणे, अंगणवाडी सेविका दिव्या करकरे, माजी उपसरपंच राजेंद्र शिंदे,आशासेविका रिया करकरे, स्वदेश फाऊंडेशनच्या गायत्री कुठवल, वैष्णवी करकरे, आदर्श शेतकरी श्रीराम दिपक करकरे, ग्रामपंचायत कर्मचारी दिपक मुकुंद करकरे, शाळेतील विद्यार्थी सौंदर्या, मानवी, प्राची, श्रेया, स्वयम्, श्रवण, शुभम, आर्यन, दिवेश, रुद्र आणि ग्रामस्थ महिला मंडळ यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती नोंदवली. या वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्दिष्ट केवळ पर्यावरणावर चांगला परिणाम करणे नव्हते, तर ग्रामीण समाजातील सर्व वयोगटांच्या सहभागासाठी जागृती निर्माण करणे हे होते. गावातील शाळेचे विद्यार्थी आणि महिला मंडळ यांचा सक्रीय सहभाग हा या कार्यक्रमाचे लक्षणीय वैशिष्ट्य होते. अशा सामूहिक प्रयत्नांमुळे गावाची पथदर्शी भूमिका तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीसाठी आदर्श बनली आहे. पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन आणि ग्रामीण विकास या दृष्टीकोनातून या वृक्षारोपणाचे महत्त्व स्पष्ट होते. या कार्यक्रमाचा उद्देश गावाच्या आच्छादनात वाढ करून, हरित पट्टी निर्माण करणे, वातावरणातील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करणे आणि उपयुक्त फळझाडांमुळे ग्रामस्थांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे हा आहे. पन्हळघर खुर्द गावाने यातून ग्रामीण पर्यावरणवादाचा आदर्श उभा करत आहे गावातील सरपंच हारदास शेडगे यांनी म्हटले, “गावकऱ्यांनी आज झाडे लावताच भविष्यात पाणी, हवा आणि जमीन सुधारण्यात मदत होईल. गावाच्या नागरिकांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे या उपक्रमाला यश लाभले.” उपसरपंच रमेश जाधव यांनीही गावकऱ्यांचे आभार मानले आणि प्रत्येक नागरिकाकडून पर्यावरण संवर्धनासाठी सहभागाचे आवाहन केले. पन्हळघर खुर्दच्या या वृक्षारोपण कार्यक्रमाचा फैलाव केवळ गावापुरता नाही, तर तालुक्यातील इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे. यामुळे गावाची पर्यावरणीय जागृती वाढत आहे. या प्रयत्नाचे महत्त्व आणखी वाढवण्यासाठी पुढे अशाच कार्यक्रमांची योजना राबविण्यात येणार आहे

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल मधील एतिहासिक स्थळांना भेट



पनवेल: जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पनवेल मधील एतिहासिक स्थळांना भेट देण्यात आली. वडाळे तलाव,बल्लालेश्वर मंदिर, राईस मिल ,कापड बाजार,मिरची गली. इस्रायल तलाव अशा विविध एतिहासिक ठिकाणांना भेट देण्यात आली. यावेळी महान शहर मावळता वारसा या पुस्तकाच्या लेखिका प्रा. स्मिता दळवी यांनी उपस्थितना एतिहासिक ठिकाणांना बद्दल माहिती दिली. पनवेल हे जसे तलावांचे शहर आहे तसेच मंदिरांचे आणि दर्गा मशिदीचेही शहर आहे. पनवेलमध्ये सहा तलाव आहेत. सर्वात मोठा असलेल्या वडाळे तलावाच्या काठी बल्लाळेश्वर आणि रामेश्वर मंदिर आहे. शहराच्या मध्यभागी असलेल्या कृष्णाळे तलावाकाठी कृष्णेश्वराचं मंदिर आहे. देवाळे तलावासमोर करमअली शाह दर्गा आहे. लेंडाळे तलावाला लागून जुम्मा मशीद आहे. विश्राळे तलावाला स्थानिक लोक जवळच्या बेने इस्रायली समाजाच्या कब्रस्तानामुळे आणि प्रार्थना स्थळामुळे इसराइल तलाव असे म्हणतात. प्रत्येक तलावाचा इतिहास भूगोल वेगवेगळा आहे. १७३९ मध्ये वसईच्या यशस्वी लढाईनंतर परतताना चिमाजी आप्पांच्या मराठा सैन्याकडून बापटांनी वडाळे तलाव खोदून घेतला अशी माहिती मिळते. या वडाळे तलावाचे पनवेल महानगरपालिकेने चांगले सुशोभीकरण केले आहे. इतरही तलावांचे जाणीवपूर्वक जतन केले तर शहराची ही फुफूसं पनवेलचे पर्यावरणीय आरोग्य अबाधित राखतील. हिंदू मुस्लिम ऐक्याची इथली गंगा जमनी तहजीबची एक कथा सांगितली जाते. देवाळे तलावाच्या काठी असणाऱ्या सुफी संत ख्वाजा करमअली शाह यांच्या दर्ग्यावर वार्षिक उरुसाच्या प्रसंगी पहिली चादर चढवण्याचा मान परंपरेनुसार पेशव्यांचे सरदार बाळाजीपंत बापट यांच्या कुटुंबासाठी राखून ठेवला जातो.. मनातलं मळभ दूर करणारा आजच्या भटकंतीतला हा क्षण आहे. जगद्गुरु संत तुकाराम देहूहून पनवेल येथील बाजारात मिरच्या विकण्यासाठी आले होते. कृष्णाळे तलावाकाठी त्यांचे सुंदर मंदिर पहावयास मिळाले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथे जवळपास ३० राईस मिल होत्या. युसुफ मिया मिल यांची चालू अवस्थेतील राईस मिल पाहिली. त्यांच्या वंशज्यांशी बोलणं झाले. १८७२ साली पुराणिक बंधूंनी धूतपापेश्वर कारखाना स्थापन केला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस अशा महान विभूतींनी या ठिकाणी आयुर्वेदिक औषधोपचार घेतलेले आहेत.. बंदर ते विमानतळ असा पनवेलचा विस्मयकारी प्रवास चालू आहे. आता बंदर अस्तित्वात नाही. कोळीवाड्यात त्या बाजूला गेलो असता काही मुलनिवासी कोळी बांधव भेट झाली . २६ जुलै २००५ च्या पुरात स्वतःला झोकून देऊन जीवाची बाजी लावून श्री कमळाकर पांडुरंग कोळी या बांधवाने तब्बल ३८ जणांचे प्राण वाचवले होते.. भारतमातेच्या या शूर वीराला मनोमन सलाम केला.. राष्ट्र सेवा दल, मिशन माणुसकी, संविधान प्रचारक, योग ग्रुप असे अनेक मान्यवर पनवेलकर या आजच्या पर्यावरण संवर्धनाच्या निमित्ताने काढलेल्या फेरीला आवर्जून उपस्थित होते.

# आंबेडकर चळवळीतील योद्धा हरपला; रिपब्लिकन नेते दिलीप जाधव यांचे निधन.



पाली: आपली संपूर्ण हयात समाजसेवा व आंबेडकर चळवळीसाठी व्यथित करून समाज प्रबोधन हा एकच ध्यास मनी ठायी असलेले रिपब्लिकन नेते दिलीप जयराम जाधव यांचे दि. १ जून रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. कालकथित दिलीप जाधव हे सुधागड तालुक्यातील भिमनगर गावचे रहिवासी होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ) पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष होते. ना. रामदास आठवले यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांना ओळखले जाते. तसेच आर पी आय चे सुधागड तालुका माजी अध्यक्ष होते. सुधागड तालुका बौद्धजन पंचायत २७५६ मध्यवर्ती कमिटीच्या उपाध्यक्षपदी कार्यरत होते. हुशार, अभ्यासू , विचारवंत, उत्कृष्ट वक्ते, चळवळीत आक्रमक भूमिका अशी ओळख असलेले दिलीप जाधव यांच्या निधनाची धक्कादायक बातमी कानी पडताच तालुक्यातून हळहळ व्यक्त करण्यात आली. परळी ग्रामपंचायतीच्या सदस्य व उपसरपंच पदी असताना त्यांनी ग्रामविकासाच्या दृष्टीने पुढाकार घेत अनेक कामे मार्गस्थ लावली. याबरोबरच त्यांनी राजकीय,सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अनेक उच्च पदे भूषवली आहेत. आंबेडकरी चळवळीत काम करीत असताना बौद्धाचार्य या माध्यमातून त्यांनी तथागत गौतम बुद्धांची शिकवण व फुले, शाहू व डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पेरण्याचे कार्य केले. त्यांच्या निधनाने संपूर्ण रिपब्लिकन व आंबेडकरी चळवळीची खूप मोठी हानी झाली असून कधी न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाची बातमी कळताच रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांनी दूरध्वनी द्वारे शोक व्यक्त करीत श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या अंत्यविधीस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हा अध्यक्ष नरेंद्रभाई गायकवाड, सुप्रसिद्ध गायिका निशाताई भगत, सुधागड तालुका बौद्धजन पंचायत सुप्रीम कमिटीचे अध्यक्ष मारुती गायकवाड, मध्यवर्ती कमिटीचे अध्यक्ष दिपक पवार, आरपीआय तालुकाध्यक्ष राहुल सोनावळे,रिपाइं नेते रवींद्रनाथ ओव्हाळ, बौद्धजन पंचायतीचे जेष्ठ मार्गदर्शक पी.बी गायकवाड, सुरेश जाधव, संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक छनक शिर्के सु.ता.बौ.पं सुप्रीम कमिटी मा.अध्यक्ष मंगेश गायकवाड,खोनपा नगरसेवक किशोर पानसरे,अमित गायकवाड,सुनील गायकवाड, नरेश शिंदे,राजेश गायकवाड, राजेश जाधव, वंचित जिल्हा संघटक राहुल गायकवाड,बौद्धाचार्य नारायण जाधव,राजेश गायकवाड,भिम महाडीक यांसह सुधागड तालुक्यासह रायगड जिल्हा व इतर भागातून अनेक मान्यवर महिला ,पुरुष व नातेवाईक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुलगे,एक मुलगी, भाऊ,जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे जलदान विधी व शोकसभेचा कार्यक्रम दि.१५ रोजी राहत्या घरी मौजे भिमनगर येथे सकाळी साडे अकरा वाजत करण्यात येणार आहे. तसेच दि.७ रोजी सुधागड तालुका बौद्धजन पंचायत यांच्या वतीने शोकसभेचे आयोजन डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह पाली येथे आयोजित करण्यात आले होते.

# दहावीतील यशस्वी विद्यार्थी आदित्य गौरव पुरस्काराने सन्मानित



पेण: शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नुकताच दहावीतील प्रत्येक विभागातील जास्तीत जास्त टक्केवारीने उत्तीर्ण झालेल्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांना आदित्य गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तालुक्यातील हमरापूर, जिते, वाशी, शिहू, वडखळ या पाच विभागातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा यात समावेश करण्यात आला होता. शिवसेना उध्दव बाळासाहेब गटाचे पेण तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या सन्मान सोहळ्याला उपस्थित असणारे पनवेल, कर्जत विधानसभा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या यशाचे कौतुक करून भविष्यात हाच विद्यार्थी देशाचे नेतृत्व करणारा व्यक्ती व्हावा अशा शुभेच्छा दिल्या.तर तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांनी दहावीमध्ये उज्वल यश प्राप्त केल्यानंतर त्यांना आपल्या पुढील शैक्षणिक वाटचालीला प्रौत्साहन देण्याच्या उद्देशाने सदर गौरवाने सन्मानित करण्यात आले आहे असे सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी नरेश गावंड, दर्शना जवके, नंदू मोकल, दीपक पाटील, वसंत म्हात्रे, कांचन थळे, निलेश म्हात्रे, चेतन मोकलशिवसेनेचे प्रत्येक विभागाचे विभाग प्रमुख आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# पनवेल परिसरातील बाजारपेठेत रानभाज्यांची आवक वाढली

पनवेल: पावसाळा सुरू झाला की कधीही दिसणाऱ्या रानमेव्याने पावसाळ्यात मार्केट फुलून जाते. कुडू, टाकळा, शेवळे, भारंग, तेलपाट, ससेकांद अशा पाहुणेमंडळींनी सध्या भाजीमार्केट फुलून गेलाय. अनेकांनी तर यातील काही नावं ऐकलीही नसतील. पण हा आहे पावसाळ्यातला रानमेवा. फक्त पावसाच्या पाण्यावर फुलणारा अत्यंस सकस आणि पौष्टीक असा रानमेवा पनवेलमध्ये दाखल झाला आहे. या सगळ्या पालेभाज्या पाहून नॉनव्हेजीटेरीयन्स जरा खडू होतील पण त्यांच्यासाठीही पावसाळ्यात मार्केटमध्ये खुप चॉईस आहे. ऐन पावसाळ्यात येणाऱ्या या करंदा, अळू, हिरवे बिरडे, आळंबी, कुड्याच्या शेंगा, कुवली, बांबूचे कोंब यांची आवक बाजारात वाढली आहे कोणत्याही रासायनिक खता-औषधांशीवाय जंगलात रूजत असल्यामुळे हा रानमेवा खूपच चविष्ठ आणि तितकाच पौष्टीक असतो. पनवेल तालुक्यामधील बाजारात काही प्रमाणात रानभाज्या विक्रीसाठी यायला सुरुवात झाली आहे. या रानभाज्यामध्ये औषधी गुणधर्म असल्याने व रासायनिक विद्राव्यापासून मुक्त असणाऱ्या या रानभाज्या असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. पावसाळा सुरू झाला की, पनवेल तालुक्यात आदिवासी भागातील डोंगरकपारी व घनदाट जंगलात राहणारा आदिवासी समाज आपल्या परिसरातील निरनिराळ्या रानभाज्या विक्रीसाठी शहरी भागात व तालुक्याच्या ठिकाणी घेऊन येत असतो.

# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 300व्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम



पनवेल: पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका ग्रामीण उत्तर मंडलाच्या वतीने एक भक्तिपूर्ण आणि सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पेंधर फाटा येथील शिवमंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, त्यानंतर जवळील गोशाळेला भेट देण्यात आली आणि समारोप महाआरतीने करण्यात आला. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा सरचिटणीस प्रल्हाद केणी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व भाजप उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर यांनी केले.कार्यक्रमात ज्येष्ठ नेते कृष्णा पाटील, युवा नेते विनोद घरत, किरण दाभणे, नितीन भोईर, भास्कर आगलावे, बाळकृष्ण पाटील, विशाल खानावकर, आशिष कडू, अंकुश पाटील, समीर गोंधळी, आकाश फडके, पवन भोईर, शुभम खानावकर, विनीत खानावकर, करण फडके तसेच भाजप कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे सामाजिक स्वच्छतेचा संदेश देण्याबरोबरच जनतेमध्ये धार्मिक व सांस्कृतिक जाणीवा जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि त्याग आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मरणार्थ अशा प्रकारचे उपक्रम आयोजित करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा हेतू या माध्यमातून साध्य करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता सामूहिक महाआरतीने करण्यात आली.

# कळंबोलीतील वसतीगृहासाठी मुलींनी अर्ज करण्याचे आवाहन

पनवेल: सरकारच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कळंबोली, पनवेलमध्ये मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह कार्यरत आहे. या शासकीय वसतिगृहात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातकारिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छुक विद्यार्थिनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे. आठवी पासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, आर्थिकदृष्ट्या मागाम, अनाथ व अपंग मुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. संपर्क उषा गुजेला (८७६७३३९९७४) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा .

# खारघर येथील गीतांजली टॉवरमध्ये भीषण आग; सुदैवाने जीवितहानी नाही



पनवेल: खारघर येथील सेक्टर ३५ मधील गीतांजली टॉवरमध्ये बुधवारी (४ जून) दुपारी भीषण आग लागली. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. इमारतीच्या १३ व्या मजल्यावर आग लागल्याचे वृत्त आहे. दुपारी लागलेल्या या आगीमुळे आकाशात काळ्या धुराचे लोट पसरले होते, जे दूरवरून दिसत होते. या घटनेची धक्कादायक दृश्ये ऑनलाईन समोर आली आहेत, ज्यामध्ये संपूर्ण इमारत आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे दिसत आहे, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. सुदैवाने, या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीची माहिती मिळताच, अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या तात्काळ घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि अग्निशमन कार्याचे समन्वय साधण्यासाठी वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले होते. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये रुग्णालयासाठी शासकीय जमीन देण्यास तत्वतः मंजुरी

पनवेल: कामगार विमा महामंडळाला रायगडसह राज्यातील अन्य महामंडळांच्या प्रस्तावित ९ रुग्णालयांना जमीन देण्यास मान्यता सरकारने तत्वतः मान्यता दिली आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरमधील २०० खाटांच्या रुग्णालयासाठी करोडीतील ५ एकर जमीन देण्यास मान्यता देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे राज्य कामगार विमा योजनेच्या रूग्णालयासाठी १५ एकर जमीन देण्यास मंगळवारी (३ जून) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. पनवेल (रायगड) बिबवेवाडी (पुणे), अहिल्यानगर, सांगली, अमरावती, बल्लारपूर (चंद्रपूर), सिन्नर (नाशिक), बारामती (पुणे), सातारा येथील प्रस्तावित रूग्णालयांसाठीही शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

# पवारांच्या राष्ट्रवादीकडून भरत गोगावलेंचा हॅप्पी बर्थ डे



पनवेल: रायगडमध्ये पालकमंत्री पदावरून शिवसेना शिंदे गट आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रचंड स्पर्धा सुरू आहे. त्यावरून परस्परांविरोधात कुरघोडी करण्याची एकही संधी सोडली जात नाही. सध्या ‘नॅपकीन वॉर’ जिल्ह्यात सुरू आहे. अशातच एकेकाळी खा.सुनील तटकरे यांचे कट्टर समर्थक मानले जाणाऱ्या शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सतिश पाटील यांनी सोमवारी मंत्री भरत गोगावले यांना निमंत्रित करून त्यांचा वाढदिवस साजरा केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्यातील विस्तव काही जात नाही. हा वाद विकोपाला गेला असून महाडमध्ये मंत्री महोदयांची कोंडी करण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी थेट स्नेहल माणिकराव जगताप यांना पक्षात आणले. काही दिवसांपूर्वी झालेल्या मेळाव्यात त्यांनी मंत्री भरत गोगावले यांच्या नॅपकीनची नक्कल करत त्यांच्यावर तोफ डागली. त्याला प्रत्युत्तर देणार नाही तर ते गोगावले, थोरवे व दळवी कसले. रोजगार हमी मंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महाड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तिघांनीही तटकरे यांच्यावर हल्लाबोल केला. त्याचबरोबर सिंचन घोटाळ्याचा मुद्दा पोटावरून ओठावर आणला. त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये महायुतीमध्ये अलबेल नसल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, मंत्री भरत गोगावले हे सोमवारी पनवेल या ठिकाणी आले असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सतिश पाटील यांनी त्यांना थेट कळंबोली येथील आपल्या शामल मोहन पाटील एज्युकेशन संकुलात निमंत्रित केले. एके काळी खासदार सुनील तटकरे यांचे निष्ठावंत आणि कट्टर समर्थक मानले जात असत. मात्र डिसेंबर २०२३ ला पाटील यांनी दोन राष्ट्रवादी झाल्यानंतर खासदार सुनील तटकरे यांची साथ सोडत मोठ्या पवारांसोबत काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

# अज्ञात चोरट्यांनी 2 लाख रुपयांची रोख रक्कम केली लंपास

पनवेल: घर कामासाठी बँकेतून दोन लाख रुपये काढून घरी जात असताना, चहा पिण्यासाठी थांबलेल्या एका इसमाच्या गाडीच्या डीकीतून अज्ञात चोरट्याने २ लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केल्याची घटना पनवेल शहरातील उरण नाका रोडवर घडली आहे. सुरेंद्र जितेकर यांनी घर कामासाठी २ लाख रुपये बँकेतून काढलेले पैसे त्यांनी रेनकोट मध्ये गुंडाळून मोटारसायकलच्या डिकीत ठेवले होते रेनकोटमध्ये गुंडाळून ठेवलेली रक्कम न आढळल्याने त्यांनी पनवेल पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# अलिफनुर जमीर खातून बेपत्ता

तळोजा एमआयडीसी येथे मच्छी घेण्यासाठी जाते असे सांगून घरातून निघून गेलेली २८ वर्षीय अलिफनुर जमीर खातून (रा. तोंडरे) ही महिला घरी परत न आल्याने ती हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली. या महिलेचा रंग गोरा, उंची ४.८ फूट असून ती अंगाने मध्यम आहे. तिने अंगात लाल रंगाचा फुल टॉप आणि लेगीज व पायात पांढऱ्या रंगाची चप्पल घातली आहे. तिला हिंदी आणि बंगाली भाषा बोलता येते. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार आर ओंबासे यांच्याशी संपर्क साधावा.

# पाणीपुरवठा योजनेचे निकृष्ट दर्जाचे काम

## ठेकेदाराला बिलही अदा

**पालघर, दि. ५ प्रतिनिधी**

१५ व्या वित्त आयोगाचा निधी ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था मूलभूत सेवा पुरवण्यासाठी या निधीचा उपयोग स्वच्छता, पाणी पुरवठा आणि पाण्याचा पुनर्वापर यांसारख्या कामांसाठी केला जातो. परंतु उदासीन प्रशासनाचे या योजनेतील कामावर लक्ष नसल्यास ठेकेदारांकडून निकृष्ट दर्जाची कामे केल्याचे प्रकार समोर येत आहेत. असाच प्रकार पालघर तालुक्यातील कुडण ग्रामपंचायत मध्ये समोर आला आहे.

कुडण ग्रामपंचायत हद्दीतील अ वॉर्ड येथे पंधरा वित्त आयोग योजनेतून सोलर पंप योजना, बोअरवेल व पाणी टाकी यासाठी राबवण्याच्या नावाखाली राज एंटरप्राइजेस या ठेकेदाराकडून रुपये ४ लाख ६८ हजार १२० इतक्या मोठ्या रकमेचे निकृष्ट दर्जाचे काम करून शासनाचा निधीचे मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी केलेल्या कामाची देयके मागील महिन्यामध्ये ठेकेदाराला अदा करण्यात आली आहेत प्रत्यक्ष अदा केलेल्या कामांची पाहणी गावातील नागरिकांनी केली असता सदर दोन्ही ठिकाणी खर्च केलेल्या सोलर योजना या निकृष्ट दर्जाच्या आहेत.

नवापाडा येथे लावण्यात आलेले सौर उर्जा पॅनल हे तारेच्या साह्याने बांधून उघड्यावरती विद्युत तारेची जोडणी केली असून येथे लोकवस्ती असल्याने व सदर पॅनल जोडणी केलेले पोलची उंची कमी असल्याने येथे लहान



मुलांचा खेळण्याचा वावर असल्याने विजेचा धक्का लागून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नळासाठी जोडणी केलेले पाईप हे दोरीच्या व तारेच्या साह्याने बांधून जोडणी करण्यात आलेली आहे. नवापाडा येथे राबवलेली संपूर्ण यंत्रणा बंद असून हातपंप व सौर ऊर्जा पॅनलवरून नियोजित केलेले नळ योजना पूर्णपणे बंद पडलेल्या अवस्थेत आहे.

बालशीपाडा येथे या कामात केलेल्या योजनेतील पाणी टाकीला छिद्र झाले असून पाणी गळत असून पाण्याचा दुरउपयोग होत आहे.सदर ठिकाणी सौर ऊर्जा यंत्रणा कंट्रोलर पॅनल व नळ जोडणी हे सुद्धा वायरच्या साह्याने बांधून जोडणी करण्यात आली आहे. सदर संपूर्ण विद्युत तारेची जोडणी सदर कामाच्या बाबतीत ग्रामस्थांनी आज प्रत्यक्ष पाहणी उघड्यावर करून ठेवली आहे.

सदर ग्रामपंचायत ग्रामसेवक यांना ग्रामस्थांनी जागेवर नेऊन या निकृष्ट दर्जाच्या कामाबद्दल दिलेल्या देयके अदा केल्याबद्दल तसेच या कामाची निविदा, देयके अदा केलेल्या ठेकेदाराचे बिल तसेच या कामाचे देयक अदा करताना ग्रामपंचायतीच्या अधिनियमानुसार त्या संबंधित वार्डातील सदस्यांचा काम पूर्णत्वाचा दाखला याबद्दल माहिती विचारली असता ती माहिती नंतर देऊ अशी प्रतिक्रिया दिली.

पाणीपुरवठा जिल्हा परिषद विभागाकडून काम पूर्णत्वाचा दाखला दिलेल्या प्रति वाचनासाठी ग्रामसेवक यांनी दिली असता त्यामध्ये सुद्धा अनेक तांत्रिक त्रुटी आढळल्या. या कामाचे बिल जमा न करता नियमबाह्य प्रक्रिया राबवून ही देयक अदा केल्याची शंका नाकारता येत नाही. सदर योजनेतून काम करताना पूर्ण केलेल्या योजनांचे सर्व फोटो संबंधित शासकीय वेबसाईटवर अपलोड करणे बंधनकारक असताना येथे अशी कोणतीही प्रक्रियेचे अवलंब केलेला नाही, असा आरोप कुडण येथील ग्रामस्थांनी केला आहे.

> या संपूर्ण गैरप्रकाराबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर यांना ग्रामस्थांच्यावतीने तक्रार देण्यात येणार आहे. संबंधित ठेकेदाराकडून बंद आणि निकृष्ट असलेल्या सर्व योजना दिलेल्या अटी शर्तीनुसार पूर्ण करून त्या चालू करून मिळण्यासाठी मागणी करणार आहेत.तसेच या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ग्रामस्थांकडून करण्यात येणार आहे.
>
> **-मिलिंद चुरी, ग्रामस्थ, कुडण**

> निकृष्ट दर्जाचा काम झाल्याचा आरोप खोटे आहे. सदर कामाचे इस्टिमेट झाले आहे. व्हॅल्यूशन झाले आहे. तसेच इस्टीमेंट व व्हॅल्यूशन झाल्यानंतरच कुठल्याही बिलाचे रकम अदा केली जाते. तसेच सदर कामाला दोन वर्षे होऊन गेली आहेत. चालू स्थितीत काम करणे आणि दोन वर्षांच्या कालावधी नंतरच्या स्थितीत काम करणे यात फरक असतो. आता दोन वर्षे उलटल्यानंतर ते पाहणी करत आहेत. फरक तर असणारच.
>
> **-भागवत कांबळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुडण**

# चार आदिवासी गावे घरकुल योजनेपासून वंचित

## हक्काच्या घरासाठी संघर्ष सुरुच



**डहाणू, दि. ५ प्रतिनिधी**

डहाणू तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत विवळवेढे (महालक्ष्मी), सोनाळे, खानिव आणि आवढाणी या चार आदिवासीबहुल गावांतील नागरिक आजही घरकुल योजनेपासून वंचित आहेत. स्वातंत्र्यानंतर आजतागायत काही नागरिकांना स्वतःचे हक्काचे घर मिळालेले नाही, ही बाब शासनाच्या गोरगरीब आणि आदिवासी विकास धोरणांवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

या संदर्भात आदिवासी अस्मिता संघटनेचे पालघर जिल्हाध्यक्ष विलास वांगड यांनी ग्रामसेवक, उपसरपंच आणि सदस्यांवर घरकुल योजनेचा सर्व्हे न केल्याचा आणि दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. गावात घरकुल योजनेची गरज असताना संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधी वेळेवर सर्व्हे करत नाहीत. त्यामुळे वर्षानुवर्षे आदिवासी कुटुंबं उघड्यावर राहत आहेत, असा आरोप वांगड यांनी केला आहे.

या चारही गावांतील घरकुल योजनेपासून वंचित महिला व पुरुषांनी पंचायत समिती डहाणू येथे गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते यांच्या कार्यालयात भेट घेऊन आपली व्यथा मांडली. गावागावातील परिस्थिती, जुन्या अर्जांची प्रलंबित स्थिती, आणि नव्या सर्वेची गरज यावर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत गटविकास अधिकारी सस्ते यांनी संबंधित गावांमध्ये लवकरच पुन्हा एकदा घरकुल योजनेसाठी सर्वे केला जाईल, अशी ग्वाही दिली. ज्यांना खरोखर गरज आहे आणि ज्यांची नावे मागील यादीतून वगळली गेली आहेत, अशा सर्व पात्र लाभार्थ्यांना नव्याने घरकुल योजना देण्यात येईल, असे आश्वासन सस्ते यांनी दिल्याने गावकऱ्यांमध्ये घरकुल मिळेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

सरकारने विविध योजना जाहीर केल्या असल्या तरी त्या खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत, ही वस्तुस्थिती आजही अनेक भागात पाहायला मिळते. डहाणू तालुक्यातील या चार गावांतील आदिवासींचा संघर्ष हेच दर्शवतो की, योजनांची अंमलबजावणी ही केवळ कागदोपत्री न राहता, जमिनीवर व्हावी यासाठी लोकांनीच पुढाकार घ्यावा लागतो, संघर्ष करावा लागतो.. आता प्रशासनाच्या आश्वासनानंतर या गावातील गरीब कुटुंबांना खरोखर घर मिळेल का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# डहाणूतील कंक्राडी-आगर रस्त्याची दुरवस्था

## ठेकेदार आणि नगरपालिकेचा हलगर्जीपणा

**डहाणू, दि. ५ प्रतिनिधी**

डहाणू नगरपरिषद हद्दीतील कंक्राडी रेल्वेखाडी ते आगर हा मुख्य रस्ता गेल्या वर्षभरापासून खड्ड्यांनी भरलेला असून, नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मंजुरी मिळूनही ठेकेदाराने कामास विलंब लावल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

डहाणू नगरपरिषदेने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करून मंजुरी मिळवली होती. त्यानुसार ठेकेदाराची नेमणूकही करण्यात आली. मात्र, अपेक्षेप्रमाणे तात्काळ दुरुस्ती सुरू होण्याऐवजी कामात टाळाटाळ करण्यात आली. केवळ खडी आणि क्रश सँड टाकून दिखाव्याची दुरुस्ती



करण्यात आली असून, त्या सैल भरावावरून दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. रस्त्याचे काम सुरू असतानाही ठेकेदाराने कुठलाही सूचना फलक लावलेला नाही, ना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. या निष्काळजी कारभारामुळे शेकडो विद्यार्थी, रुग्ण आणि वाहनचालक रोज अपघाताच्या भीतीत प्रवास करत आहेत. घाचियापाडा, आंबेमोरा, आगर, नरपड, आंबेवाडी, खाडीपाडा आणि चिखले या भागातील हजारो नागरिक दररोज या मार्गाचा वापर करतात. मुंबई-गुजरातकडे प्रवास करणाऱ्यांची दिवसरात्र वर्दळ असलेला हा रस्ता खराब अवस्थेमुळे जीवघेणा ठरत आहे. त्यातच परिसरातील पथदिवे बंद असल्याने रात्रीचा प्रवास अधिक धोकादायक झाला आहे. या संपूर्ण प्रकरणात ठेकेदाराची कामचुकार वृत्ती, नियोजनशून्य पद्धती आणि नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष यामुळे संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. मंजुरी मिळूनही वेळकाढूपणा करणाऱ्या ठेकेदारावर नगरपरिषद काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चिंचघर ग्रामपंचायतीचा प्लास्टिक मुक्तीचा संकल्प




**वाडा, दि. ५ प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचघर ग्रामपंचायतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रम राबवून गाव प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प केला आहे.

वाडा तालुक्यातील चिंचघर ग्रामपंचायतीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून ग्रामस्थांकडून संकलित केलेले प्लास्टिक द्या व कापडी पिशवी घेऊन जा हा उपक्रम राबवला. मागील दोन वर्षांपासून चिंचघर ग्रामपंचायत ,सीएसीआर व ईपीएल या स्वयंसेवी संस्थांच्या सोबतीने गावात प्लास्टिक संकलन मोहीम राबवत असून, संकलित केलेला प्लास्टिक पुनर प्रक्रियेसाठी पाठवला जातो. या प्लास्टिकपासून पेन, कचराकुंडी, बाकडे इत्यादी वस्तू तयार केल्या जातात व प्लास्टिकचा पुनर्वापर केला जातो. त्यामुळे गावामध्ये स्वच्छता ठेवण्यासाठी या उपक्रमाचे सहाय्य लाभले आहे.

ग्रामपंचायतीने गुरुवारी गावातील दुकानदार ,व्यापारी वर्ग यांना कापडी पिशव्यांचे वाटप करून, प्लास्टिक पिशवी न वापरण्याचे आवाहन केले. केंद्र व राज्य सरकारच्या प्लास्टिक बंदी कायद्याबाबत गावात जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यावेळी आयोजित कार्यक्रमाला सरपंच प्रेमा नांगरे, उपसरपंच मनेश पाटील, सदस्या संगीता भोईर, ग्रामपंचायत अधिकारी एकनाथ मेरे, स्वच्छ भारत मिशनचे जिल्हास्तरीय तज्ञ विशे ,तालुका समन्वयक किरण मोरे, सीएसीआरच्या समन्वयक मंजुषा सोनवणे, कृतिका , आयसीडीएस पर्यवेक्षिका कोळी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

# कोरेगाव भीमा जयस्तंभ तालुका अध्यक्षपदी ज्ञानेश्वर पालवे

**मोखाडा, दि. ५ प्रतिनिधी**

भीमा कोरेगाव विजयस्तंभ विकासासाठी सरकार अनेक वेळा निधीची घोषणा करीत असले तरी भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असल्याने कसलाही विकास करता येणार नाही म्हणून प्रथम न्यायालयाचा खटला जिंकणे ही आपली सर्वांची पहिली आणि सामुहिक जबाबदारी आहे. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण व जागेचा मालकी हक्क हा प्रशासकीय व न्यायालयीन लढा प्रत्येक गावात, शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात व राष्ट्रीय पातळीवर जनजागृती करण्यासाठी व हा लढा समाजभिमुख व्हावा म्हणून जनजागृती अभियान राबवण्यात येणार आहे. न्यायालयाचा खटला गतिमान व्हावा आणि लवकरात लवकर निकाल लागावा म्हणून या लढ्यात सर्वांनी सहभागी व्हावे म्हणून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समिती स्थापन करण्यात आलेली असून कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे अध्यक्ष दादाभाऊ अभंग यांनी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीच्या



मोखाडा तालुका अध्यक्ष या पदावर ज्ञानेश्वर पालवे यांची नियुक्ती करण्यात आली असून ते मागील अनेक वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत कार्यरत आहेत. ज्ञानेश्वर पालवे हे युवा कार्यकर्ते असून सामाजिक आंदोलनात ते सक्रिय असतात. ज्ञानेश्वर पालवे हे पत्रकार असून अनेक दैनिकंतून त्यांनी पाणीटंचाई, वीज, माता मृत्यू, बालमृत्यू, रस्ते लोकांच्या हितासाठी वर्तमानपत्रातून सतत कार्य करीत आहेत. सामान्य जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्याचे काम ते पत्रकार क्षेत्रातून मागील वीस वर्षापासून करत आहेत. महापुरुषांच्या विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी ते विविध सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करतात.

# अखेर पाड्यावरून सुरु झाली जग वाचवण्याची मोहीम

## राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल

**डहाणू, दि. ५ प्रतिनिधी**

बांबू लागवडीसाठी पालघर जिल्ह्यामध्ये मोठा वाव आहे. या लागवडीतून जिल्ह्यातून होणारे स्थलांतर देखील रोखता येणे शक्य आहे. बांबू उत्पन्न महिला बचत गटाच्या माध्यमातून मार्केट लीकेज आणि प्रक्रिया उद्योगाला जोडण्याचे पुढील तीन ते पाच वर्षात प्रयत्न करू. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन बांबू लागवडीतून आपले जीवन बदलावे, असे प्रतिपादन राज्य कृषी मूल्य आयोग व कार्यकारी मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्सचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी आज धानिवरी ता.डहाणू येथे केले. 'संपूर्ण विश्वभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा होत असताना महाराष्ट्रातील दुर्गम पालघर जिल्ह्यातील धानिवरी ता.डहाणू या आदिवासी पाड्यावर अभिनव 50 लाख बांबू वृक्ष लागवडीचा संकल्प प्रत्यक्ष बांबू लागवड शुभारंभ करून झाला. त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास राज्याचे पण सहकार व वस्त्र उद्योग सचिव प्रवीण दराडे, जिल्हाधिकारी डॉ.इंदूराणी जाखड, उपविभागीय अधिकारी विशाल खत्री, वनसंरक्षक निरंजन दिवाकर, उपजिल्हाधिकारी (मनरेगा) विजया जाधव, धानिवरीचे सरपंच शैलेश कोडा, उद्योगपती दिनेश शर्मा आदि मान्यवर उपस्थित होते.

बांबूची चळवळ ही राज्य आणि देशपातळीवर पोहचली. पालघर जिल्हा प्रशासनाने बांबू लागवडीबाबत चांगला दृष्टिकोन स्वीकारला आहे. बांबूच्या माध्यमातून निश्चितपणे पालघर जिल्ह्याचा कायापालट होऊ शकतो. ही चळवळ पुढे नेण्यासाठी जी काही शासन स्तरावरून मदत आणि मार्गदर्शन लागेल ते निश्चितपणे माझ्याकडून दिले जाईल, अशी ग्वाही पाशा पटेल यांनी यावेळी दिली.

पारंपारिक भातशेतीचे गणित शेतकऱ्यांच्या उपस्थितीत उलगडून सांगत न परवडणाऱ्या भात शेतीपेक्षा सात लाख चार हजार रुपयांच्या अनुदान देऊन केलेली बांबू शेती आदिवासींचे आणि शेतकऱ्यांचे जीवन बदलेल. वातावरण बदलाचे संकट रोखण्यासाठी बांबू महत्त्वाचा आहे. यातून सर्वाधिक ऑक्सिजन निर्मिती आणि कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेण्याची क्षमता आहे. बांबू लागवडीसाठी खड्डे, रोपे, देखभालीचा खर्च सर्व शासन स्तरावरून अनुदानाच्या रूपाने




शेतकऱ्यांना मिळणार आहे.

धानिवरी गावाने सहकार्य दाखवून 1 हजार बांबू उत्पादक शेतकरी उभे केल्यास केंद्राच्या योजनेतून बांबूचे युनिट याच गावात उभे करू. त्याचबरोबर महिला बचत गट आणि स्वयंरोजगाराच्या संधी गावातच निर्माण केल्या जातील. त्यासाठी शक्य झाल्यास गाव देखील दत्तक घेण्याची तयारी असल्याचे पटेल यांनी यावेळी सांगितले. तसेच बांबूपासून विविध प्रकारचे इंधन निर्मिती करणे शक्य असल्याचे सांगत त्यासाठी पालघर जिल्ह्यात प्रकल्प उभारून जवळपास दोन लाख टन बांबूची गरज निर्मिती करण्याची तयारी असल्याचे सांगितले.

धानिवरी गावातून बांबू लागवडीचा शुभारंभ होत आहे. प्रशासनाला फक्त योजना राबवून अनुदानाचा लाभ द्यायचा नाही तर संपन्न कुटुंब आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी हे ध्येय देखील पूर्ण करायचे आहे त्यासाठी सर्वांचेच सहकार्य आवश्यक आहे. गावाने मिळालेल्या 50 हेक्टर सामूहिक वनपट्ट्यांमध्ये बांबू लागवड करण्याचा निर्णय घेतल्याबद्दलही त्यांनी यावेळी गावकऱ्यांचे आभार मानले.

यावेळी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाने संपन्न मिशन कुटुंब आणि सर्वांगीण ग्रामसमृद्धी हरित महाराष्ट्र अंतर्गत पर्यावरण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शेवटी धानिवरी गावचे सरपंच शैलेश घोडा यांनी यावेळी सर्व उपस्थित त्यांच्या आभार व्यक्त केले.

# डान्स बारविरुद्ध प्रहार संघटनेसोबत भाजपा मंडळ अध्यक्षाचे सरकार विरुद्ध ठिय्या आंदोलन

**उल्हासनगर, दि. ५ प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कारकिर्दीत उल्हासनगर, कल्याण आणि डोंबिवली या शहरात बेकायदेशीर चालत असलेल्या डान्स बार विरुद्ध कारवाई करण्यात आली होती. आता हे सर्व डान्स बार फडणवीस सरकारच्या कारकिर्दीत पुन्हा राजरोष पणे सुरू असल्याचा आरोप करीत प्रहार संघटना समवेत भाजपच्या मंडळ अध्यक्षाने पोलीस उपायुक्त कार्यालया समोर ठिय्या आंदोलन करून शहरातील सर्व अवैध धंद्या सह डान्स बार बंद करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान आपल्याच सरकार विरोधात आंदोलनात भाग घेतल्याने मंडळ अध्यक्ष बंटी कुसरीजा अडचणीत आले असून भाजपा कार्यकर्त्यांनी ही बाब भाजपा अध्यक्ष राजेश वधारिया यांच्या निदर्शनात आणून दिली आहे.

उल्हासनगरात सध्या आठ ते नऊ डान्स बार सुरु असून हे डान्स बार बेकायदेशीर पणे सुरु असल्याचा आरोप करीत प्रहार संघटने अध्यक्ष ॲड. स्वप्निल पाटील, कल्याण प्रजा पार्टी चे शैलेश तिवारी भाजपा मंडळ अध्यक्ष बंटी कुसरीजा यांनी पोलीस उपायुक्त कार्यालया समोर फडणवीस सरकार विरोधात ठिय्या आंदोलन करताना माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्या डान्स बार वर तोडफोड ची कारवाई करून बार बंद पाडले होते. तेच डान्स बार पुन्हा राजरोषपणे फडणवीस सरकारच्या कारकिर्दीत कसे सूरु झाले आहेत. असा सवाल करत हे सर्व डान्स बार बंद करण्यात यावे अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केले आहे. दरम्यान या आंदोलनात भाजपा मंडळ अध्यक्ष बंटी कुसरीजा यांनी भाग घेत आपल्याच पक्षाच्या मुख्यमंत्री विरोधात आंदोलन केल्याने सर्वांच्या भुवव्या उंचावल्या आहेत. दरम्यान पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी बेकायदेशीर चालणाऱ्या डान्स बार विरुद्ध कारवाई चे आश्वासन दिले आहे.


**पनवेल महानगरपालिका**

**शहर अभियंता विभाग**

**ई-निविदा सुचना**

**निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/६५२५/प्र.क्र.५२/१९३३/२०२५** **दिनांक:०५/०६/२०२५**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/ २४/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर सेक्टर-२३ मधील इस्कॉन मंदिरासमोरील मुख्य रस्त्याच्या दुभाजकामध्ये स्टेनलेस स्टील (S.S.) रेलिंग बसवणे. | २१,९९,५५४/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०६/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.२४१/२४३/२०२५**
**दिनांक:०५/०६/२०२५**



**महाराष्ट्र शासन**

**सा. बां. (आदिवासी) विभाग, ठाणे**

**ई-निविदा सूचना प्रसिध्दी क्रं.५ सन-२०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२५४१००४६ हे ई-निविदाव्दारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत वर्ग ५ व त्यावरील स्थापत्य विषयक कंत्राटदार यांचेकडून मागवित आहे. निविदा डाऊनलोड करण्याचा दि.०६/०६/२०२५ ते दि.१३/०६/२०२५ पर्यंत. निविदा पूर्व बैठक दि.०९/०६/२०२४ रोजी दु. १२.०० वाजता मा.मुख्य अभियंता, बांधकाम भवन कक्ष, आदिवासी विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) किंवा ऑनलाईन घेण्यात येईल. ई-निविदा उघडण्याचा दिनांक- १६/०६/२०२५ (शक्य झाल्यास)

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (अ+ब) (रु.लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग | निविदा संचाची किंमत व प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा कळमदेवी, ता. उपलाट, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ७,३८,७६,७६०/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| २ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा खुटल, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत | ७,३४,९२,०२१/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ३ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा उपलाट, ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G + 7) इमारत. | ७,३१,०७,७७८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ४ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा संकुल ऐना ता. जव्हार जिल्हा. पालघर येथे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम | ७,२८,९०,७१८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ५ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा सवणे, ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ७,१५,११,६००/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ६ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा एम्बूर, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत | ७,०८,३३,४२१/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ७ | सवतगव्हाण ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील मुलींच्या वसतिगृहाच्या (G + 2) इमारतीचे बांधकाम | ७,००,९८,७०२/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ८ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा वरुडा, ता. जिल्हा. धाराशिव येथे मुलांच्या वसतिगृहाची (G + 3) इमारत. | ६,९३,२१,३३८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ९ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा लालठाणे, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G + 3) इमारत. | ६,३०,३५,७०३/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| १० | शासकीय आदिवासी आश्रम शाळा ओझर ताः जव्हार जिः पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,९०,०४,७४०/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| ११ | शासकीय आश्रम शाळा वरसई, ता. पेण, जिल्हा. रायगड येथे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे (G+३) बांधकाम | ५.८७,५८.९९९/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| १२ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा सूर्यमाळ ताः मोखाडा जिः पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,८७,३०,७२८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| १३ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा घनवळ ताः मोखाडा जिः पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,८७,०१,३७४/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |
| १४ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा वरखंडा (दापचरी), ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+२) इमारत. | ५,८२,०४,८९२/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी -१ |

१. सर्व पात्र/ इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे. सदरील कामात काही बदल अथवा वेळेत बदल झाला तरीही तो बदल नमूद वेबसाईटवर पहावे. या बाबत फेर वर्तमान जाहीरात करण्यात येणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी.
२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावी. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा / बयाना रक्कम ई-निविदा संचाचे किंमत याबाबत दस्तऐवजाच्या मुळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.
३. एक कंत्राटदार, फर्म किंवा कंपनीस या निविदा सुचनेतील उल्लेख केलेल्या १४ कामांपैकी एकच काम घेता येईल. जर कंत्राटदार, फर्म किंवा कंपनी पहील्या किंवा कोणत्याही एका कामाच्या निविदेत सर्वात कमी निविदा देकार सादर करणारा आढळल्यास त्यांचे इतर निविदा उघडल्या जाणार नाहीत आणि त्यांनी या निविदा सुचनेमध्ये सादर केलेल्या इतर देकारांना निविदांमध्ये अपात्र मानले जाईल. निविदा उघडण्याचा क्रम हा निविदेत नमुद केलेल्या कामांच्या अनुक्रमांकाप्रमाणे (ई-निविदा क्रमांक) प्रमाणे असेल.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

**जा.क्र.साबां (आ) विठा/ठाणे/निविदा/क्रं.५/२९४९**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे**
**९ वा मजला, पार्किंग प्लाझा बिल्डिंग,**
**ज्यूपिटर हॉस्पीटल जवळ, पूर्व द्रुतगती मार्ग, ठाणे (प.) ४००६०११**
**ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com**
**दिनांक :- ०२/०६/२०२५**

**डी.जी.आय.पी.आर. आरओसी-२०२५-२६/क्र-५/सी१०११**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे**

# ११ मृत्यूंना जबाबदार कोण?

बुधवार ४ जून रोजी संध्याकाळी बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमच्या गेट नंबर एकवर चेंगराचेंगरी झाली. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला. हे लोक रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या आयपीएल जिंकल्याचा आनंद साजरा करण्यासाठी आले होते. चेंगराचेंगरीच्या वेळी आरसीबी संघ विधानसभा भवनात होता. येथे कर्नाटक सरकारने त्यांचा सत्कार केला. सत्कार समारंभ आणि उत्सव संपले आहेत, परंतु चेंगराचेंगरीला जबाबदार कोण आहे हा प्रश्न कायम आहे.

चौकशी केल्यावर असे समजले की पोलिस, प्रशासन, सरकार, आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक क्रिकेट असोसिएशन, सर्वजण चुका करत होते. लाखो लोकांची गर्दी जमत होती, पण त्यांना रोखणारे कोणीही नव्हते.

सीएम सिद्धरामय्या यांनी स्वतः कबूल केले की जेव्हा आरसीबी संघ विधानसभेत पोहोचला तेव्हा बाहेर एक लाख लोक होते. त्याच वेळी, चिन्नास्वामी स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली, जिथे ३ लाख लोक जमले होते. आम्हाला एवढी मोठी गर्दी अपेक्षित नव्हती. आम्ही यासाठी तयार नव्हतो.

कर्नाटक विधानसभा आणि चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरू सेंट्रल येथे आहेत. येथेच आरसीबीचा सत्कार समारंभ आणि विजयी परेड होणार होती. बंगळुरू सेंट्रलचे पोलिस उपायुक्त शेखर एच. टेकन्नावर हे कायदा सुव्यवस्था, गर्दी आणि वाहतूक नियंत्रण आणि मार्ग नियोजनासाठी जबाबदार होते.

आरसीबी व्यवस्थापनाने ४ जून रोजी सकाळी सोशल मीडियावर विजय परेडची घोषणा केली होती. दुपारी ३:१५ वाजता, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर विजय परेड तिकिटांची जाहिरात पोस्ट करण्यात आली.

तरीही पोलिसांनी परेडसाठी परवानगी दिली होती की नाही हे स्पष्टपणे सांगितले नाही. प्रश्न असा आहे की जर परवानगी दिली गेली असेल तर इतक्या मोठ्या गर्दीचे व्यवस्थापन कसे केले गेले? जर परवानगी दिली गेली नसेल तर त्याबद्दल संदेश का देण्यात आला नाही?

या घटनेनंतर आता सत्ताधारी काँग्रेस आणि त्या राज्यातील विरोधक भाजप यांच्यात आरोप प्रत्यारोपांचा राजकीय सामना सुरू झाला असला तरी अजून काही प्रश्न कायमच राहतात.

चिन्नास्वामी स्टेडियमची क्षमता फक्त ३५-४० हजार लोकांची आहे, मग २-३ लाख लोकांच्या गर्दीला जमण्याची परवानगी कशी देण्यात आली? गर्दी किती असेल याचा अंदाज आधीच लावला नव्हता का? विविध ठिकाणी बॅरिकेडिंग करून गर्दी का वळवली नाही? जेव्हा गर्दी जमू लागली तेव्हा ड्रोन आणि सीसीटीव्हीद्वारे त्याचे व्यवस्थापन का केले गेले नाही?

आरसीबी व्यवस्थापन आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनशी बोलणे आणि ४ जून रोजी होणाऱ्या कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे आणि त्यानुसार नियोजन करणे ही जिल्हा दंडाधिकारी जगदीश जी यांची जबाबदारी होती. ते संघ विमानतळावर उतरण्यापासून ते स्टेडियममध्ये पोहोचण्यापर्यंतचा मार्ग नकाशा तयार करून वेळेसह प्रसिद्ध करू शकत होते.

जर हे केले असते तर चाहत्यांना काय करावे हे कळले असते. दुपारपर्यंत कोणालाही माहित नव्हते की विजय मिरवणूक होणार नाही. गर्दी विजय मिरवणूक पाहण्यासाठी आली होती.

जर विजय परेड आयोजित न करण्याचा निर्णय घेण्यात आला असेल, तर जिल्हा माहिती विभागाने त्याबद्दल लोकांना माहिती का दिली नाही? प्रशासनाला माध्यमे आणि



सोशल मीडियाद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचवता आला असता, परंतु कोणतेही स्पष्ट नियोजन दिसले नाही आणि कार्यक्रमाशी संबंधित निर्णयाची माहिती लोकांना देण्यात आली नाही.

बंगळुरूमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीचे कारण पोलिस प्रशासनाचे अपयश आणि बेजबाबदार वृत्ती आहे. पोलिस विभाग राज्याच्या गृहमंत्र्यांच्या अधीन आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांच्यावर स्थानिक पोलिस गुप्तचर यंत्रणेमार्फत गर्दीचा अंदाज घेण्याची जबाबदारी होती. गर्दीचा अंदाज घेतल्यानंतर ते राखीव पोलिस दल आणि अधिक पोलिस तैनात करू शकले असते. जिल्हा पोलिसांना मदत करण्यासाठी अतिरिक्त दल तैनात केले असते.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, स्टेडियमबाहेर गर्दी वाढताच पोलिसांनी लाठीमार केला. यामुळे चेंगराचेंगरीही झाली. याचे व्हिडिओही समोर आले आहेत.

माजी यूपी डीजीपी विक्रम सिंह म्हणतात, 'ही चेंगराचेंगरी पोलिस खात्याचा पूर्ण निष्काळजीपणा दर्शवतो. पोलिस त्यांच्या जबाबदारीपासून पळून जाऊ शकत नाहीत. पोलिस म्हणतात की त्यांना कमी वेळ मिळाला, परंतु जरी त्यांना वेळ मिळाला नाही, तरीही संपूर्ण व्यवस्था करण्याची जबाबदारी तुमची आहे.'

कर्नाटक सरकारमधील उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांना आरसीबीच्या विजयानंतरचा उत्सव एक मोठा कार्यक्रम बनवायचा होता. ते मीडियामध्येही याबद्दल बोलत होते. डीके शिवकुमार बंगळुरू शहरात काम करणाऱ्या विविध एजन्सींसाठी जबाबदार आहेत. दुपारी ३ वाजताच्या सुमारास, डीके शिवकुमार स्वतः आरसीबी संघाचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर पोहोचले. त्यांनी विमानतळावर खेळाडूंचे स्वागत केले. दुपारी ३:३० वाजता त्यांनी एक्सवर विमानतळाचा फोटो पोस्ट केला.

शिवकुमार या कार्यक्रमाचे नेतृत्व करत होते. पोलिस प्रशासन, स्थानिक जिल्हा प्रशासन आणि आयोजकांमध्ये बैठक घेऊन संपूर्ण नियोजन करण्याची जबाबदारी त्यांची होती. नियोजन केल्यानंतरच त्यांनी विजयी परेडसाठी परवानगी देणे आवश्यक होते. जर त्यांना हवे असते तर विजयी परेड आणि सत्कार समारंभ एक-दोन दिवस पुढे ढकलता आला असता.

स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरी झाली तेव्हा आत विजयाचा जल्लोष सुरू होता, असे वृत्तही आले होते. यावर मुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी दावा केला की, 'मी ताबडतोब संघाकडे गेलो आणि त्यांना सांगितले की कार्यक्रम १० मिनिटांत थांबवावा. संघाने यावर सहमती दर्शवली आणि त्यांनी ५ मिनिटांत कार्यक्रम थांबवला. कोणतीही घटना घडू नये अशी आमची इच्छा असल्याने आम्ही त्यांच्यासोबत पोलिस पथके पाठवली.'

संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी आरसीबी व्यवस्थापनावर होती. हा कार्यक्रम चिन्नास्वामी स्टेडियममध्ये होणार होता, त्यामुळे कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनचाही त्यात सहभाग होता. आता ११ जणांच्या हकनाक मृत्यूनंतर राजकारण सुरू झाले आहे. सरकारच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. विरोधक तुटून पडत आहेत. जबाबदार असलेल्यांना शिक्षा होणार का? हा प्रश्न कायम आहे.

■ ■ ■

# इंडीया आघाडीचं काही खरं नाही!

लोकसभा निवडणूकांच्या काळात मजबूत अवस्थेत असलेल्या इंडिया आघाडीला ग्रहण लागले आहे. इंडीया आघाडीतील एक महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या आम आदमी पक्षाने आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. हे कधी तरी होणारच होते.

कारण लोकसभा निवडणुकांनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या होत्या. हरयाणा विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्याने त्याचा फटका इंडिया आघाडीतील काँग्रेसला बसला होता. विधानसभेच्या पाच जागांवर काँग्रेस आणि आपच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची बेरीज,विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती.

खरे पाहता जवळ जवळ सर्वच निवडणूक चाचण्यांमध्ये, काँग्रेसला हरयाणा विधानसभा निवडणुकीत सहजपणे विजय मिळेल, असे अंदाज वर्तवण्यात आले होते, परंतु इंडिया आघाडीतील काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता होऊ न शकल्याने, काँग्रेसला अनपेक्षितपणे पराभव पत्करावा लागला.

दिल्ली विधानसभा निवडणुकात आम आदमी पक्षाला फाजील आत्मविश्वास नडला.२०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या एकूण ७० जागांपैकी ६७ जागा जिंकून भाजपाचा पालापाचोळा केला होता.त्यानंतर २०२० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाने विधानसभेच्या ७० जागांपैकी ६२ जागा जिंकल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर २०२५ च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचा आत्मविश्वास कमालीचा वाढला होता. मात्र भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी जेलची वारी केल्यानंतर दिल्ली मधील सामान्य नागरिकांचा आम आदमी पक्षावरील विश्वास उडाला होता.त्याचा फटका दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला बसला आणि पक्षाला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीत असलेल्या काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यात निवडणूक समझोता झाला असता तर कदाचित आम आदमी पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला नसता.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत १७ जागांवर आम आदमी पक्ष आणि काँग्रेस यांना मिळालेल्या मतांची बेरीज, विजयी भाजपा उमेदवारांना मिळालेल्या मतांपेक्षा जास्त होती, ही गोष्ट लक्षात घेतली तर हे दोन पक्ष वेगळे लढल्याने आम आदमी पक्षाला त्याचा कसा फटका बसला,या प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळते.

इंडिया आघाडीतील बेबनाव दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या वेळी समोर आला होता. अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने त्या निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा न देता आम आदमी पक्षाला पाठिंबा दिला होता.आता अधिकृतरित्या आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केल्याने आघाडीला मोठाच धक्का बसला आहे.

मध्यंतरी काँग्रेसचे नेते पी.चिदंबरम यांनी इंडिया आघाडीच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली होती.ममता बॅनर्जी या सतत इंडिया आघाडीच्या आत बाहेर करत असतात.

लोकसभा निवडणुकीत ममतांनी इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या, मार्क्सवादी कम्युनिस्ट आणि काँग्रेस बरोबर निवडणूक समझोता केला नव्हता.पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असलेल्या ममतांनी लोकसभा निवडणुकीत स्वतंत्रपणे लढून, नेत्रदीपक विजय मिळवला होता.

महाराष्ट्रात इंडिया आघाडीचे अस्तित्व असून नसल्यासारखे आहे. आघाडीतील तीन महत्त्वाचे घटक पक्ष असलेल्या, शिवसेना (उबाठा ), राष्ट्रवादी काँग्रेस (शप ) आणि काँग्रेस यांची तोंडे तीन दिशांना आहेत.

शिवसेना ( उबाठा) हा पक्ष अधून मधून, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याच्या गोष्टी करत असतो.शिवाय शिवसेना ( उबाठा) आणि मनसे एकत्र आल्यास ते इंडिया आघाडीत राहतील की नाही याबाबत शंकाच आहे.

उत्तर प्रदेशात २०२७ मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.परंतु इंडिया आघाडीतील प्रमुख घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि समाजवादी पक्ष यांच्यात आतापासूनच जागा वाटपावरून रूसवे फुगवे सुरू झाले आहेत.

जम्मु-काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला हे इंडिया आघाडीच्या कामकाजाबाबत नाराज आहेत.पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, तेंव्हा ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीचे घटक पक्ष असलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी निवडणुक समझोता करतील असे वाटत नाही.

केरळमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडी हे एकमेकांचे पारंपरिक राजकीय शत्रू आहेत.इंडीया आघाडीत असूनही, हे पक्ष पुढील वर्षी होणाऱ्या केरळ विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरोधात लढतील. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेतली तर इंडिया आघाडीचे काही खरे नाही, असेच म्हणावे लागेल. ■ ■ ■



अभय गोखले

# केल्याने होत आहे रे.. आधी केलेची पाहिजे..

आळस हा माणसाचा शत्रू आहे. तसे तर माणसाला शत्रू आवडत नाहीत. पण, आळस हा नेहमी आपल्या सोबत असतो. आळस झटकून कामाला लागा. मग तुमच्या इच्छित ध्येयापर्यंत एक दिवस नक्कीच पोहोचाल. असा विचार करून प्रयत्न करत राहिल्यास एक दिवस स्वप्न सत्यात उतरल्याशिवाय राहणार नाही असा विचार करूनच केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे...असे संत रामदास स्वामी यांनी म्हटले आहे. जीवनात उत्तरोत्तर कर्म करत राहिल्यास कर्म हे दैव बनून जाते.

मानवी जीवनात कष्टाला अनन्यसाधारण महत्त्व आहे कष्ट प्रामाणिक असले तर यशाला ही पर्याय नसतो. सतत प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते. मराठीमध्ये एक सुभाषित आहे प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे. म्हणून सतत प्रयत्न करत राहिले पाहिजे.

इंग्लिश मध्ये एक म्हण आह.. वर्क इज वर्कशीप.आपले कर्म करीत राहणे हेच आपले कर्तव्य आहे. कर्मा पेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे. जीवनात आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे यासारखे श्रेष्ठ कार्य दुसरे कोणतेही नाही. आयुष्याचा मार्ग क्रमण करीत असतांना जीवन जगण्यासाठी कष्ट करणे अपरिहार्य आहे.

जीवन जगत असताना काम करण्यासाठी प्रेरणा मिळणे आवश्यक असते. तसेच आपल्या आवडीचे काम मिळणे हे सुद्धा आवश्यक आहे. ज्या कामात आपल्याला रुची नाही ते काम आपल्याला कंटाळवाणे वाटते. जगण्यासाठी प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात. प्रत्येकाला वेगळ्या गोष्टीत रस असतो. जीवनामध्ये नऊ रसांपैकी प्रत्येकाला वेगवेगळ्या गोष्टी रस वाटतो. जीवन हे कैरीच्या फोडी सारखे असते. आंबट कैरीला मिठाची चव लावून खाल्ली की ते रुचकर लागते. जीवनाचेही त्याप्रमाणेच आहे. कैरीच्या फोडीला तिखट मीठ लावलं तर छान चविष्ट लोणचं बनते. कच्ची कैरी जेव्हा पिकते तेव्हा त्याचा गोड आंबा बनतो. जीवनाचे सुद्धा असेच आहे कधी आंबट कधी गोड असे आयुष्य आपलं असतं.

आयुष्यात गोड आंबट तिखट कडू सगळ्या चवी असतील तर आनंद जगण्यात रस वाटतो. जेवणाच्या ताटात फक्त गोड पदार्थ असतील तर आपल्याला जास्त गोड जेवण आवडणार नाही. त्याचप्रमाणे जीवनाच्या ताटात गोड आंबट कडू अशा विशिष्ट चवीची आवश्यकता असते. तसेच जीवनाच्या थाळीत सुख आणि दुःख हे सुद्धा वाढले जातात. त्यामुळे आपल्याला कधी सुखाची तर कधी दुःखाची चव चाखायला मिळते. ज्याप्रमाणे दह्यापासून चविष्ट असे आंबट गोड श्रीखंड तयार होते. आणि त्याची चव जास्त वाढते. त्याचप्रमाणे आपल्या जीवनात कष्ट प्रामाणिक असतील तर जगण्याला चमक आणि चकाकी येते.

प्रा. सौ. वर्षा विलास कावरे
बालाजी नगर, मूर्तिजापूर, अकोला. 9021673178

आपले हित घडवून आणण्याचे सामर्थ्य प्रत्येक मानवात असते फक्त त्यासाठी कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. समर्थ रामदास स्वामी याच गोष्टीवर भर देताना दिसतात. कधी कधी आपण अपयशाबद्दल दुसऱ्याला दोष देतो. दुसऱ्याला नावे ठेवतो परंतु अशावेळी आपले दोष पाहणे देखील आवश्यक असते. उत्तुंग भरारीसाठी कष्टाची आवश्यकता आहे. आणि कष्ट प्रामाणिक असले तर यशालाही पर्याय नसतो. ■ ■ ■

## वाचक लिहितात


### अन्यथा वारकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल!

आषाढी पालखी सोहळा १५ दिवसांवर आला असताना महापालिका विकास आराखड्यात मोशी आणि डूडूळगाव सीमेवर आळंदी पासून तीन किलोमीटर अंतरावर कत्तलखाना आरक्षित करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले. पालखी सोहळ्यानिमित्त लाखो वारकरी आळंदी आणि देहू या ठिकाणी पालखीत सहभागी होण्यासाठी येतात. या पालखीमार्गातच पशुवधगृह उभारण्यास परवानगी मिळाल्याने समस्त वारकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

वारकरी संप्रदाय हा संपूर्ण भारतातील सर्वांत मोठा संप्रदाय आहे. आषाढीची पंढरपूर वारी हा वारकऱ्यांचा सर्वांत मोठा उत्सव. या उत्सवानिमित्त महाराष्ट्रासह देशभरातून वारकरी मंडळी ऊन,वारा, पाऊस कशाचीही तमा न बाळगता पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात. हजारो किलोमीटरचा प्रवास पायी करण्याचे बळ विठूमाऊलीच त्यांना देत असते. गळ्यात तुळशीची माळ घालून भक्तिमार्गाची कास धरणारा हा वारकरी धारण केलेल्या माळेचे पावित्र्य राखण्यासाठी मांसाहार, मद्यपान त्यागतो. माउली प्रत्येक क्षणी आपल्याकडे पाहात आहे या भावाने आचारधर्माचे पालन करतो.

'ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस' हा अभंग सर्वांनाच ठाऊक आहे. वारकरी संप्रदायांचा पाया रचणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर यांची समाधी आळंदी या गावी आहे, त्यामुळे वारकऱ्यांसाठी ही भूमी काशीहून उणे नाही. अशा ऐतिहासिक भूमीचे पावित्र्य राखणे हे सरकारचे कर्तव्य आहे; मात्र या कर्तव्याचा विसर पडलेल्या सरकारने आता या पवित्र भूमीच्या परिसरातच पशुवधगृह उभारण्याचा घाट घातला आहे. ज्यामुळे लाखो वारकऱ्यांसह समस्त हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. जनभावनेचा विचार करून सरकारने आळंदी क्षेत्रात पशुवधगृह उभारण्यास केलेल्या भूमीचे आरक्षण रहित न केल्यास येत्या आषाढी वारीत सरकारला वारकऱ्यांच्या रोषाचा सामना करावा लागेल हे निश्चित आहे.

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.



## तांब्याच्या बाटलीतून पाणी किती वेळा प्यावं?

आजच्या घडीला मानवी जीवनात प्लास्टिक किंवा काचेच्या बाटल्या कालबाह्य होत चालल्या आहेत. ऑनलाइन शॉपिंग साइट्स उघडताच तांब्याच्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या विविध प्रकारच्या बाटल्या दिसतील. तांब्याच्या बाटल्या, तांब्याचे ग्लास, आणि वेगवेगळ्या डिझाईनचे तांब्याचे कप सुद्धा मोठ्या प्रमाणावर विकले जात आहेते.

तांब्यापासून बनवलेल्या भांड्यांची मागणी अधिक आहे. कारण पुन्हा एकदा तांब्याच्या भांड्यातून पाणी पिण्याची फॅशन किंवा प्रवृत्ती वाढली आहे. तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्याने आरोग्य सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत होते, असा अनेकांचा विश्वास आहे. पण ही सवय खरंच किती आरोग्यदायी आहे?

ल्यूक हे आहारतज्ज्ञ, फिटनेस ट्रेनर आणि लाईफस्टाइल कोच आहेत. अनेक बॉलिवूड कलाकारांनी त्यांचे मार्गदर्शन घेतले आहे. ल्यूक सांगतात की, एकेकाळी आपल्या आजी-आजोबांना तांब्याच्या ग्लासमधून पाणी पितांना पाहिलं जायचं. प्राचीन भारतात तांब्याची भांडी खूप वापरात होती. तांब्याच्या ग्लासमध्ये रात्री पाणी ठेवून सकाळी ते पिण्याची परंपरा होती. यामुळे शरीर निरोगी राहत असे आणि पचनशक्तीही सुधारायची. तांबे मेटाबॉलिक रेट वाढवतो, हे नक्कीच. मात्र, याचा फायदा किती होतो हे तुम्ही ते कसे आणि किती वेळा वापरता यावर अवलंबून असते.

पूर्वी तांब्याची भांडी वापरली जात होती पण दिवसातून एकदोन वेळाच तांब्याच्या ग्लासमधून पाणी प्यायलं जात होतं. पण आज उलटं होतंय झ तांब्याच्या फायद्यांचा विचार करून लोक संपूर्ण दिवसभर तांब्याच्या बाटलीत पाणी भरून ठेवतात. परिणामी, शरीरात जास्त प्रमाणात तांबे जातो आणि त्यामुळे विविध आरोग्यविषयक समस्या उद्भवतात.

तांबे थायरॉईडची समस्या कमी करू शकतो. पण जर तुम्ही दिवसभर फक्त तांब्याच्या ग्लास किंवा बाटलीतूनच पाणी पित असाल तर शरीरातील कॉपरची मात्रा वाढते. यामुळे थायरॉईड ग्रंथीला नुकसान होऊ शकते.

शरीरात खूप जास्त तांबे मिसळला गेला तर रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होऊ शकतात. अपचन होऊ शकते. पोट फुगणे, उलट्या होणे, चक्कर येणे, अशा तक्रारी वाढू शकतात. पचनसंस्थेत संसर्ग होण्याची शक्यताही वाढते. त्यामुळे तांब्याच्या बाटलीतील पाणी वारंवार पिवू नका.

■ ■ ■

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी लोकसंख्यावाढ रोखणे अनिवार्य!

जागतिक पर्यावरण दिन नुकताच साजरा झाला. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे कोणत्याही देशाच्या सरकारपुढील मोठे आव्हान असते. भारतही त्याला अपवाद नाही. विज्ञानाने वैद्यकीय क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे देशातील मृत्युदर कमालीचा घटला आहे याउलट वाढत्या लोकसंख्येवर सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही.

चीनमध्ये वाढती लोकसंख्या देशाच्या विकासावर परिणाम करत असल्याचे लक्षात येताच तेथील सरकारने लोकसंख्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरु केले. १९७९ सालापासून चीनने एकल अपत्य धोरण देशभरात सक्तीने राबवले. ज्यामुळे सुमारे ४०० दशलक्ष नवीन जन्म चीनला रोखता आले. भूभागाच्या बाबतीत भारताच्या तीन पटीने मोठ्या असलेल्या चीनने लोकसंख्येच्या बाबतीत मागील अनेक दशकांपासून आपले नाव पहिल्या क्रमांकावर कायम ठेवले होते.

वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटत असल्याचे लक्षात आल्यावर मात्र चीनने ती रोखण्यासाठी पुष्कळ मेहेनत घेतली. एप्रिल २०२३ मध्ये भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. विकासाच्या नावावर मते मागणा?या मोदी सरकारने वाढती लोकसंख्यावाढ हा विकासातील सर्वात मोठा अडथळा असल्याचे लक्षात येऊनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. वाढत्या लोकसंख्येच्या आधारे देश जगातील चवथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता बनला आहे असेही मत आहे.

मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते.

शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे हे संकट वर्षागणिक अधिक भयावह होऊ लागले आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. ज्यामध्ये परप्रांतीयही असतात आणि बांगलादेशी घुसखोरही असतात. यांच्या निवासासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि झोपडपट्टी दादा यांच्या आशीर्वादाने ठिकठिकाणी अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्या निर्माण होऊ लागल्या आहेत. मतांच्या लाचारीसाठी हे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वीज आणि पाणी यांसह कागदपत्रांची आणि रोजगाराची सोयही करून देतात.

वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. मुंबईसारख्या ठिकाणी सकाळी आणि संध्याकाळी लोकल ट्रेनमधील गर्दी पाहता त्यातील प्रवास म्हणजे मृत्यूचा खेळ झाला आहे. चालत्या गाडीतून पडल्यामुळे प्रतिदिन कितीतरी अपघात होतात; मात्र हा धोका पत्करण्याशिवाय चाकरमान्यांकडे अन्य पर्याय नसतो.

लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत.

शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. भूमीच्या आणि समुद्राच्या खालूनही भुयारी मार्ग आणि मेट्रो प्रकल्प उभारण्यात आले आहेत. शहरातील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे.

रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

रोजगारासाठी शहरात येऊन निवृत्त झालेले नागरिक शहरांतील वाढत्या प्रदूषणामुळे निवृत्तीनंतर गावची वाट धरू लागले आहेत. शहरांतील वाढती लोकसंख्या लक्षात घेता या विकासकामांना पर्याय नाही. त्यामुळे ग्रामीण भागांत अधिकाधिक रोजगारनिर्मिती करणे यासोबत देशातील वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण आणणे आज अत्यंत आवश्यक बनले आहे. लोकसंख्यावाढ वेळीच रोखली गेली नाही तर भविष्यात देशातील समस्त शहरे मृत्यूची केंद्रे बनल्यावाचून राहणार नाहीत.

■ ■ ■



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### टाळू शकता..!

जशी करणी
तशी भरणी
शाश्वत सत्य
आहे जिवनी ..!

रोपटे लावले बाभळीचे
तर येणारच त्यास काटे
नको यावयास दुःखाश्रू
भविष्यात डोळ्यावाटे ..!

विचार करुनच
करावी कृती
जीवनी ना येई
पश्चातापाची स्थिती ..!

# महागाईच्या फटक्याने ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या बकरी बाजारावर मंदीचे सावट

**भिवंडी दि. ५ प्रतिनिधी**

बकरी ईदनिमित्त कुर्बानीसाठी खास बकरा हवा असतो, बकरी ईद म्हणजे ईद - उल - अधा हा त्यागाचा सण म्हणून येत्या ७ जून रोजी मुस्लिम धर्मीय बांधव मोठ्या उत्सवात साजरा करत असतात. दरम्यान ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या बकरी बाजारात पावसामुळ बकरे खरेदी कमी प्रमाणात होत असल्याच दिसून आले . तर काही पर राज्यातील बकरा व्यापारी आणि बकरी ईद निमित्तानं कुर्बानीसाठी बकरा घेणारे ग्राहक यांच्याशी प्रस्तुत प्रतिनिधीने वार्तालाब केली असता महागाईमुळं बाजार मंदीचं सावट असल्यानं यंदाचा बाजार नरम गरम असल्याचं सांगण्यात आलं. ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठा बकरी बाजार भिवंडी तालुक्यातील कोनगाव तरीपाडा भागात आहे. गेल्या अनेक वर्षापासून या



ठिकाणी आठवड्यातून तीन दिवस बारामाही बकरी बाजार भरतो . त्यातच दरवर्षी बकरी ईद निमित्तानं हा बाजार महिनापासून सुरू आहे. या बकरी बाजारात संपूर्ण जिल्ह्यात सुप्रसिद्ध असून मंगळवार, गुरुवार व शनिवार या तीन दिवसात भरणाऱ्या या बकरी बाजारात यंदा बकरी ईद निमित्तानं बकरे विक्रीसाठी गुजरात, राजस्थान ,उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातून मोठ्या संख्येने व्यापारी आले आहेत . मात्र गेल्या २० दिवसापासून खूपच कमी प्रमाणात बकरे विक्री झाल्याची खंत एका बकरा व्यापाऱ्याने प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली. बकरी ईद सणाला कुर्बानीसाठी पांढरा शुभ्र बकऱ्याला अधिक मागणी असल्यानं हे बकरे २५ हजारापासून ते ९० हजारपर्यंत विक्री केली जाते. मुस्लिम बांधव हे बकरे महाग असूनही खरेदी करताना दिसत आहे. विशेष म्हणजे पर राज्यातील बकरे कोनगाव

> जोधपुर, राजस्थान येथून बकरे विक्रीसाठी बाजारात आणले आहेत.परंतु पावसामुळे खरेदीदारांची संख्या कमी झाली आहे. आणि बकरे उघड्यावर बांधल्याने पावसाने बकऱ्यांची तब्येत खालावत असल्याने बोकड विक्री करताना भावही कमी मिळत आहे. त्यामुळे यावेळी आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.
>
> **-सद्दाम शेख**
> **बकरे विक्रेता**

बकरी बाजार उघड्यावरच बांधून ठेवत असल्यानं पर राज्यातील बकरे पावसामुळं आजारी पडत असल्याचे व्यापारी सांगत आहे. आठवड्यातील मंगळवार, गुरुवार व शनिवार या तीन दिवसात भरणाऱ्या या बकरी बाजारात बकरे विक्रीसाठी गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यातून मोठ्या संख्येने व्यापारी येत असतात. तर दुसऱ्या दिवशीच्या मटण विक्रीसाठी अनेक खरेदीदार मटण विक्रेते खाटीक या ठिकाणी बकरे खरेदीसाठी येत असतात. मार्च ते मे महिन्यात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लग्न सराई होती. या लग्न सराईत हळदी सभारंभात मटणाची जेवणावळी असते. त्यामुळं या दिवसातही बकऱ्यांच्या किंमती १० ते ३० हजारापर्यंत खरेदी विक्री होत असते. मात्र यंदाच्या बकरी ईद सणावर पावसाचं सावट असल्यानं बकरे व्यापारी चिंता व्यक्त करताना दिसत आहे. विशेष म्हणजे पर राज्यातील व्यापारी ट्रक - टेम्पोने हजारो किलोमीटरचा प्रवास करून या बकरी बाजारात बकरे आणले जातात. परंतु प्रवासाचे भाडेही अजूनही वसूल झाले नसल्याचे एका व्यापाऱ्याने सांगितले.

# ऑनलाईन हमाल कंत्राटदाराकडून आरपीएफचा बेकायदेशीर वापर


## 20 वर्षांपासून काम करणाऱ्या हमालांवर अन्याय

**वसई, दि.५ प्रतिनिधी**

वसई रोड रेल्वे स्थानकावर मागील 20 वर्षांपासून निष्ठेने कार्यरत असलेल्या हमाल बांधवांवर अचानक संकट कोसळले आहे. नव्याने आलेल्या ऑनलाईन हमाल कंत्राटामुळे या पारंपरिक हमालांना त्यांच्या कामावरून हटवले गेले असून, त्यांच्यावरील उपजीविकेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी याप्रकरणी वसई रोड स्टेशन मास्तरांसह आरपीएफ अधिकाऱ्यांची भेट घेऊन यावर तोडगा काढण्याची आग्रही मागणी केली आहे.

हमाल कंत्राटदाराकडून रेल्वे सुरक्षा दलाच्या माध्यमातून गेल्या वीस वर्षांपासून वसई रेल्वे स्टेशनवर कार्यरत हमालांना हटवण्यात आले आहे. एवढ्यावरच न थांबता, विरोध करणाऱ्या हमालांना "पट्ट्याने मारू, गुन्हे दाखल करू" अशी धमकी देण्यात आली, असा आरोप स्थानिक हमालांनी केला आहे. या अन्यायकारक व बेकायदेशीर प्रकाराची गंभीर दखल भारतीय जनता पार्टीने घेतली आहे.

भाजपा महाराष्ट्र प्रदेशाच्या केरळ प्रकोष्ठाचे संयोजक उत्तम कुमार यांनी स्थानिक भाजपा पदाधिकारी सिद्धेश तावडे, बाळा सावंत, एच. आर.



सक्सेना यांच्यासोबत वसई रोड स्थानकाच्या स्टेशन मॅनेजर व आरपीएफ अधिकाऱ्यांची भेट घेऊन हा मुद्दा उचलून धरला. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे जाब विचारत या हमाल बांधवांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. उत्तम कुमार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "दोन दशके सेवा देणाऱ्या हमालांना एका क्षणात हटवून नव्या ऑनलाईन यंत्रणेचा अंमल करणे हा फक्त अन्याय नाही, तर त्यांच्या कुटुंबाच्या रोजीरोटीवर गदा आणण्यासारखे आहे. आम्ही या प्रकाराची सखोल चौकशी आणि अन्यायग्रस्त हमालांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवू, असा इशाराही उत्तम कुमार यांनी यावेळी दिला."

स्थानिक हमाल बांधवानी या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला असून, प्रशासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करून कामगिरी बजावणाऱ्या हमाल बांधवांचे हित जपावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वसई रोड रेल्वे प्रशासनाने याबाबतीत वरिष्ठ पातळीवर ही गोष्ट कळवणार आहोत. मागील 20 वर्षापासून वसई रेल्वे स्थानकावर सेवा देणाऱ्या हमाल बांधवांवर अन्याय व्हावा अशी आमची सुद्धा मानसिकता आहे, अशी भूमिका असल्याचे याबैठकीत सांगितले. हमालांना न्याय न मिळाल्यास भविष्यात भाजपा रस्त्यावर उतरेल अशी भूमिका भाजपाने घेतली आहे. याबाबतीत लवकरच पुढील बैठक होणार असल्याचे उत्तम कुमार यांनी सांगितले.

# वसई विकास बँकेला पुरस्कार



**वसई, दि. ५ प्रतिनिधी**

वसई विकास बँकेला बी टू बी इन्फो मीडिया ह्या कंपनीने बेस्ट अर्बन को ऑपरेटिव्ह बँक, आणि बेस्ट डिजिटल बँक ऑफ द इयर, या पुरस्काराने सन्मानित केले. त्याचप्रमाणे बँकेचे सीईओ अशोककुमार तिवारी यांना बेस्ट सीईओ, या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार सुमनेष जोशी डेप्युटी डिरेक्टर जनरल कंमूनिकेशन मंत्रालय यांच्या हस्ते देण्यात आला. बँकेला मिळालेला पुरस्कार बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दिलीप ठाकूर यांनी स्वीकारला.

वसई विकास बँकेच्या बोरिवली, वसई विरार, नालासोपारा, पालघर, बोईसर, नाशिक, ओरंगाबाद याठिकाणी शाखा असून गेली ४० वर्षे ही बँक सहकार क्षेत्रात आपले वेगळेपण जपून काम करत आहे. बँकेला मिळालेल्या ह्या पुरस्कारात बँकेचे सभासद, हितचिंतक, कर्मचारी, अधिकारी आणि संचालक मंडळाचा मोठा वाटा असल्याचे बँकेचे चेअरमन आशय राऊत यांनी सांगितले. या सर्वांच्या पाठिंब्यामुळेच बँक विकासाकडे अग्रेसर आहे. आम्ही यापुढेही डिझिटल क्रांतीचे पाऊल चालत राहणार आहोत. आणि ग्राहकांना चांगल्यात चांगली सुविधा उपलब्ध करून डब्यास कटिबद्ध आहोत, असे आशय राऊत यांनी यावेळी सांगितले. बँकेला मिळालेल्या ह्या पुरस्कारांबद्दल वेगवेगळ्या स्तरातून बँकेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# महामार्गावरील अपूर्ण पुलाच्या कामामुळे अपघात वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा

**तलासरी, दि. ५ प्रतिनिधी**



मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील धानिवरी परिसरात अपूर्ण ब्रिजच्या कामामुळे पुन्हा एकदा अपघाताची घटना घडली आहे. गुजरातकडून मुंबईच्या दिशेने येणारी आयशर टेम्पो (क्रमांक: DD01 F 9875) अपूर्ण असलेल्या ब्रिजच्या साईटवर आदळून रस्त्याच्या एका बाजूला उलटला. सुदैवाने गाडी सावकाश असल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र वाहनातील मालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच अपघातानंतर वाहतूक कोंडी होऊन वाहनचालकांना त्रास सहन करावा लागला.

महामार्गावरील धानिवरी पुलावर लावण्यात आलेले काँक्रीटच्या डिव्हायडर अयोग्य पद्धतीने लावले गेले आहेत. त्यामुळे वाहन चालवताना अडथळे निर्माण होऊन समोर दिसत नाहीत. याच ठिकाणी कोणताही सूचनाफलक, दिशादर्शक चिन्ह किंवा सावधगिरीचा इशारा नसल्याने वाहनचालकांना अपघाताची शक्यता अधिक आहे. स्थानिक नागरिक आणि प्रवाशांच्या मते, मागील दीड वर्षांपासून या ब्रिजचे काम संथगतीने सुरू आहे. सध्या केवळ एकाच लेनवरून वाहतूक सुरू असून, सकाळी व संध्याकाळी या ठिकाणी भीषण वाहतूक कोंडी होते. विशेषतः गुजरातहून मुंबईच्या दिशेने येणारी वाहने संथगतीने पुढे सरकतात, तर अनेकवेळा मुंबई लेनवरील वाहने विरुद्ध दिशेने घुसखोरी करतात. परिणामी दोन्ही लेन धानिवरी ब्रिजजवळ पूर्णपणे ठप्प होतात.

वाहतूक नियंत्रणासाठी या ठिकाणी कोणतेही शासकीय नियोजन नसल्याचे स्पष्टपणे जाणवते. या मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकावे लागते, यामुळे वेळ आणि इंधनाचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत आहे. स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि प्रवासी यांच्यातून आता संताप व्यक्त केला जात असून, संबंधित प्रशासनाने या अपूर्ण पुलाच्या कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, सुरक्षेसाठी आवश्यक ती चिन्हे, सूचना व मार्गदर्शक फलक लावावेत, तसेच वाहतूक सुरळीत राहील यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली जात आहे.

# जलजीवन मिशन अंतर्गत प्रशिक्षण



**डहाण, दि. ५ प्रतिनिधी**

जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल से जल पुरवठा करण्यात येणार असून याकरता जलस्त्रोतांना दुषित आणि प्रदुषणापासून संरक्षण देण्यासाठी स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरणांची गरज ओळखून शासन स्तरावरुन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

केंद्र शासनच्या निवड सुचितील मुख्य संसाधन संस्थामार्फत जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जलस्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील पाच प्रतिनीधींचे दोन दिवसीय अनिवासी प्रशिक्षण व पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती प्रशिक्षणाचा शुभारंभ पंचायत समिती पालघर अंतर्गत चिंतामणी मंगल कार्यालय सभागृह येथे करण्यात आला. तर डहाणु तालुक्यामध्ये लक्ष्मी प्लाझा हॉल, डहाणु येथे शुभारंभ करण्यात आला. सदर प्रशिक्षणाला ग्राम पाणी पुरवठा समिती अध्यक्ष-सरपंच व सचिव- ग्रामसेवक व इतर तिन सदस्य उपस्थित होते.

पाणी टंचाई दूर करण्यासाठी आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी एक परिवर्तनकारी निर्णय असून, या माध्यमातून ग्रामीण समुदायांमध्ये सामाजिक आर्थिक स्तर उंचावणेसाठी चालना देण्यात येईल. जल जीवन मिशन हा केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सन २०१९ पासून राबविला जात आहे. प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वैयक्तिक कार्यात्मक घरगुती नळ कनेक्शनाद्वारे सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

# खोणी ग्रामपंचायत हद्दीत पाणी तुंबले



**भिवंडी दि. ५ प्रतिनिधी**

भिवंडी शहरालगत असलेल्या खोणी ग्रामपंचायत हद्दीत एक ते दिड फूट पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालकांचे आणि नियमित शहराकडे येणाऱ्या हजारो नागरिकांचे हाल झाले होते. भिवंडी तालुक्यातील ६० गावांचा एमएमआरडीए मध्ये समावेश झालेला असून शहरालगत असलेल्या खोणी गावाकडे एमएमआरडीए प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. वास्तविक खोणी ग्रामपंचायत शहरालगत असल्याने येथील लोकसंख्या आणि व्यावसायीक वाढ झालेली दिसून येते. त्याचबरोबर अनधिकृत बांधकामे आणि अस्वच्छतामुळे येथील दैनंदिन समस्यामध्ये वाढ होत असते. शहरातील आदर्श पार्क रोड जवळील खाडीपूल ओलांडला कि खोणी ग्रामपंचायतीची हद्द सुरु होते. या मार्गावरून पलीकडील सुमारे २० गावातील हजारो नागरिक शहरात विविध कामासाठी येत असतात. तर विद्यार्थी देखील शिक्षणासाठी येतात. गेल्या काही दिवसांपासून शहरात व परिसरात पाऊस कोसळत असल्याने खोणी गावातील या रहदारीच्या रस्त्यावर एक ते दीड फूट पाणी साचत आहे. या मार्गावरील गटारे साफ न केल्याने गटारांवर अतिक्रमण केल्याने पाण्याचा प्रवाह खुंटला आहे. त्यामुळे या मार्गावरील नागरिकांचे हाल सुरु आहे. हा पाण्याचा प्रवाह सुरळीत करून रस्त्यावरील पाणी दूर करावे ,यासाठी नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली आहे.

# मीरा भाईंदरच्या क्लस्टर योजनेला विरोध

**भाईंदर, दि. ५ प्रतिनिधी**

स्थानिक राहिवाश्यांना अंधारात ठेऊन गृहनिर्माण सोसायटी इमारतीमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या हजारो सदनिका धारकांना जाचक अटी शर्ती घालून सत्ताधारी भाजप सरकार बिल्डरांच्या हितासाठी क्लस्टर योजना जबरदस्तीने लादत असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद सामंत यांनी केला आहे. राणी सती मार्ग रहिवाशी संघर्ष समितीच्या मुकेश मेहता, बिपीन मेहता, जगदीश शर्मा, हेमा पाटील आदींनी काँग्रेस नेते माजी आमदार मुझफ्फर हुसैन यांना निवेदन देत न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. हुसैन यांच्या वतीने युवा नेत्या आफरीन सय्यद यांनी काँग्रेस भवन कार्यालयात येऊन निवेदन स्विकारले. माजी गटनेता जुबेर इनामदार, जिल्हा प्रवक्ते प्रकाश नागणे यावेळी उपस्थित होते.

सध्या महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. सत्ताधारी भाजपप्रणित महायुती सरकार क्लस्टरच्या नावाखाली जाचक अटी, शर्ती, नियम लावत गृहनिर्माण संस्थावर अंकुश ठेऊ पाहत आहे. आपल्या लाडक्या बिल्डरांच्या फायद्यासाठी ही योजना आणली जात असल्याचा आरोप जिल्हा प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी केला आहे. ग्रामपंचायत काळात बांधलेल्या कित्येक इमारती जर्जर, मोडकळीस, धोकादायक स्थिंतीमध्ये आहेत, अश्या वेळी समूह विकास शक्यच नाही. प्रत्येक सोसायटीला पुनर्विकास करण्याचा अधिकार हवा, राहिवाश्यांना बेघर करण्याचा डाव असून आपल्याकडे कित्येक वर्षे इमारती बांधल्या जात नाहीत हा अनुभव आहे. त्यामुळे रहिवाश्यांचा विरोध लक्षात घेता काँग्रेस पक्ष कायदेशीर मार्गाने लढाई लढून राहिवाश्यांना न्याय देईल, असे आफरीन सय्यद यांनी सांगितले.

# नाझरेथ कुटिन्हो यांचे निधन

**वसई, दि.५ प्रतिनिधी**



येथील विद्यार्थी प्रिय शिक्षक व कॅथलिक बँकेचे माजी अध्यक्ष नाझरेथ कुटिन्हो यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८३ वर्षाचे होते. नाझरेथ कुटिन्हो यांनी अनेक वर्ष कार्डिनल ग्रेशस हॉस्पिटल, आदर्श किसान सोसायटी व शिक्षण सहाय्यक मंडळाद्वारे सेवा कार्य केले. वसईतील न्यायदान चळवळीत त्यांचे मोलाचे योगदान होते. रमेदीमाता तीर्थस्थान चर्चमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी वसईतील सामाजिक, राजकीय आणि सहकार चळवळीतील नामवंत हजर होते. त्यांच्या निधनाबद्दल आर्चबिशप फेलिक्स मच्याडो, बिशप थॉमस डिसोजा, फादर एरीक आल्फान्सो, फ्रान्सिस कुटिन्हो, मॅगी कोलासो, सिल्वेस्टर परेरा, पायस कुटिन्हो यांनी शोक संवेदना व्यक्त केल्या आहेत.

# भांडणाच्या रागातून शेजाऱ्याची बदनामी करणाऱ्यावर अब्रुनुकसानीचा दावा

**भिवंडी दि. ५ प्रतिनिधी**

शेजाऱ्यांमध्ये झालेल्या भांडणाच्या रागातून एका शेजाऱ्याने दुसऱ्या शेजाऱ्याच्या फोटोसह त्याच्या बदनामीचा टंकलिखित मजकूर व्हॉट्स अप वर व्हायरल करून बदनामी केली आहे. तर पिडीत शेजाऱ्याने बदनामी करणाऱ्या शेजाऱ्याच्या विरोधात न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. दिनेश बाळाराम जाधव असे पीडित विधी शाखेत अंतिम वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव असून मिलिंद चंद्रकांत जाधव असे बदनामी करणाऱ्या शेजाऱ्याचे नाव आहे. त्यानुषंगाने दिनेश आणि मिलिंद हे दोघे पुंडास खालिंग या गावात राहत असून एकमेकांचे शेजारी राहत आहेत. दरम्यान दिनेश जाधव यांची बहीण दीपाली जाधव आणि शेजारी मिलिंद जाधव यांच्यात २३ मे रोजी जोरात भांडण झाले होते. याप्रकरणी दिपालीच्या फिर्यादीवरून मिलिंद जाधवसह त्याच्या कुटुंबियांच्या विरोधात गणेशपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच रागातून मिलिंदने त्याच्या गावातील "आम्ही खालिंगकर" या व्हॉट्स अप ग्रुपवर दिनेश याचा फोटो प्रसारित करण्यासह "दिनेश बाळाराम जाधव बोगस तोतया – नकली वकील" या शिर्षकाखाली खोटे व बनावट मजकूर टंकलिखित करून दिनेशची बदनामी केली आहे. त्यामुळे याप्रकरणी दिनेशच्या फिर्यादीवरून मिलिंदच्या विरोधात गणेशपुरी पोलिस ठाण्यात भान्यासं कलम ३५६(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मिलिंदच्या विरोधात वकिलामार्फत अब्रुनुकसानीचा ५ लाख रुपयांचा दावा ठोकण्यात आला असून त्याच्यासह साथीदारांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

# आगीत कापड कारखाना जळून खाक



**वसई, दि. ५ प्रतिनिधी**

मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील वसई फाटा येथे असलेल्या कापड कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत कारखाना जळून खाक झाला. महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या जवानांनी दीड तासाच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवले. याआगीत कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, कारखान्याचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले.

वसई फाटा येथे असलेल्या आर्टीमाईज आऊटलेट या कापड्याच्या कारखान्याला बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास आग लागली होती. कापड, साहित्य आणि रासायनिक पदार्थ असल्याने आग काहीवेळातच भडकून त्याचे भीषण आगीत रुपांतर झाले. याघटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्नीशमन दलाच्या सहा बंबांनी घटनास्थळी धाव घेतली. आग विझवण्यासाठी अग्नीशमन दलाच्या जवानांना तब्बल दीड तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले.

याआगीत कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र, कंपनी जळून खाक झाल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. आगीचे कारण अद्याप कळू शकलेले नाही. याआगीमुळे ज्वालांचे लोट पसरल्याने परिसरात घबराट पसरली होती.

# महिलेची छेड काढणाऱ्याला अटक

**भिवंडी दि. ५ प्रतिनिधी**

२४ वर्षीय महिला खाजगी कामासाठी रस्त्याने पायी जात असताना महिलेच्या पाठीमागून दुचाकीने आलेल्या तरुणाने महिलेची छेड काढल्याचा संतापनजक प्रकार कामतघर परिसरातील हनुमान नगरमध्ये सोमवारी सकाळी घडला आहे. याप्रकरणी तरुणाच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास अटक केली आहे. राजु नारायण चेंनुरी (३४) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,२४ वर्षीय पीडित महिला कामतघर परिसरात राहत असून ती २ जून रोजी सकाळी खाजगी कामानिमित्त रस्त्याने कामतघर येथील हनुमान नगर मधील मारुती मंदिराच्या बाजूकडील कृष्णकांत चौधरी शाळे जवळून जात असताना राजू ह्याने दुचाकीने पीडितेच्या पाठीमागून येवून पीडितेची छेड काढून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले आहे. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून शहर पोलिस ठाण्यात राजूच्या विरोधात भान्यासं कलम ७८ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येवून पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सोमवारी रात्री ३ वाजता राजूला ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेने कामतघर परिसरातून संताप व्यक्त केला जात असून आरोपीला कठोर शिक्षेची मागणी नागरिकांकडून होत आहे. या घटनेचा पुढील तपास पोउनि विजय कडाळे करीत आहेत.

# पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांचा वसईत दौरा



**वसई, दि. ५ प्रतिनिधी**

शासकीय - निमशासकीय कार्यालयांमध्ये ७ कलमी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम संपन्न झाल्यानंतर मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी नायगाव व वसई पोलीस ठाण्याला गुरुवारी भेट दिली.

यादौऱ्यात पोलीस आयुक्त पांडेय यांनी पोलीस ठाण्यासह परिसराची त्यांनी पाहणी केली. शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रम संपन्न झाल्यावर पोलीस ठाणे अद्ययावत करून परिसरातील स्वच्छता याबरोबरच आगामी काळासाठी सुविधा, उपायोजना कशा स्वरूपात करता येतील याबाबत त्यांच्याकडून माहिती घेण्यात आली. यावेळी वसई पोलीस ठाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टीने त्यांनी अधिकाऱ्यां बरोबर चर्चा केली.

येथील पाच एकर जमिनीवर विविध ठिकाणी कर्मचारी वसाहती, खेळाचे मैदान, नवीन कार्यालयासाठी तजवीज करण्याच्या दृष्टीने सदरची भेट होती. वसई परिमंडळ २ च्या उपायुक्त पौर्णिमा चौगुले - श्रींगी , सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे, वसई पो. ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण घाडीगावकर, नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदम व अन्य पोलीस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# ‘स्वित्झरलंड’: स्वर्गीय अनुभूती



स्वित्झरलंड युरोपमधील सर्वांत सुंदर देश... येथील घड्याळे आणि चॉकलेट विश्वविख्यात आहेत. येथील हवा खूपच थंड असते. बर्फाच्छादित डोंगर, चारही बाजूंनी व्यापलेली हिरवळ, रंगीबेरंगी फुलांच्या बागा, मधुर आवाजात गाणारे पक्षी, स्वच्छ-सुंदर रस्ते आणि निसर्गसौंदर्याने बहरून गेलेली पर्यटनस्थळे, यामुळे 'स्वित्झरलंड'पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनले आहे.

येथील 'राईन फॉल'हे पाहण्याजोगे पर्यटनस्थळ आहे. रेल्वेने विंटरथर जाऊन तेथून दुसरी रेल्वे पकडून 'राईन फॉल' येथे जाता येते. या प्रवासातही निसर्गसौंदर्य पाहताना खूपच मजा येते. सुंदर, छोटी-छीटी आणि विशेष म्हणजे स्वच्छ गावे, सगळीकडे हिरवळ आणि त्यामध्ये चरणाऱ्या गाई हे दृश्य पाहताना मन प्रसन्न होऊन जाते. घाटमाथ्यातून गाडी धावू लागली की 'राईन फॉल'आल्याची जाणीव होऊ लागते. रेल्वेतून उतरताच समोर निसर्गसौंदर्याने बहरून गेलेला नजरा दिसतो. धबधब्यांचे जोरदार आवाज, अंगावर उडणारे पाण्याचे तुषार अनुभवत घाटात खाली उतरण्यासाठी पायवाट आहे. घनदाट जंगलातून हा रस्ता गेला आहे. काही अंतर चालल्यावर समोर युरोपातील सर्वांत मोठ्या 'राईन फॉल'दृश्य दिसते आणि आपण थक्क होऊन जातो. पाण्याचे तुषार, त्यावर कोवळे उन्ह पडताच निर्माण होणारे इंद्रधनुष्य, पाहतच बसावेसे वाटते.

येथून रेल्वेने ज्यूरिखला जाता येते. येथील स्विस भोजनाचा स्वाद काही औरच आहे. याठिकाणी मोठे शॉपिंग मार्केट आहे. विशेष करून ज्यूसेस, फ्रूट्स आणि ब्रेडस मिळतात. एक दिवसाच्या मुक्कामानंतर लूजर्नला जाता येते. येथे जाणाऱ्या रेल्वे कमालीच्या फास्ट असतात. स्वच्छ, आरामदायी असण्याबरोबरच बाहेरील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे असल्याने कितीही मोठा प्रवास असला तरी थकवा जाणवत नाही. लूजर्नमध्ये राहण्यासाठी चांगली हॉटेल्स आहेत. याठिकाणी प्रसिद्ध लेक लूजर्न आणि चॅपल ब्रिज पाहण्यासारखे आहे. शहराच्या सुरक्षिततेसाठी सेंट पीटर चॅपल यांच्या नावाने हा ब्रिज चौदाव्या शतकात बांधण्यात आला आहे. हा पुल पूर्णपणे लाकडाचा आहे, हे विशेष. दोन्ही बाजूस रंगीबेरंगी फुलांनी सजावट करण्यात आली आहे. वरून पॅक असणाऱ्या या पुलाच्या आतील भागात लूजर्न शहराचा इतिहास सांगणारी चित्रे आहेत.

याठिकाणी 'माउंट पीलेटस' हे खास आकर्षण असणारे स्थळ आहे. लेक लूजर्न येथून बोटीने जाता येते. हा प्रवासातही समुद्राकाठचे निसर्गसौंदर्य आल्हादकारक आहे. बीचवरील सुंदर गावे, डोंगर, हिरवळ पाहता पाहता कॉगविल कधी येते ते समजतच नाही. येथून पुडे रेल्वेने प्रवास करावा लागतो. ही रेल्वे उंचच उंच टेकड्या आणि खोल दऱ्यांमधून धावते. विशेष म्हणजे जगातील सर्वांत चढावरून धावणारी ही रेल्वे आहे. दऱ्याखोऱ्यातून 'माउंट पीलेटस' मध्ये पोहोचल्यावर येथील दृश्य पाहताना स्वर्गीय अनुभूती होते. येथे एक दिवस थांबून धम्माल करता येते. घाटातून रेल्वेप्रवास करण्याचा अनोखा अनुभव घेल्यानंतर खाली उरण्यासाठी केबल कारचा अनुभवही रोमांचकारक आणि कायम स्मरणात राहण्यासारखा आहे. कारण ७००० फुट उंचीवरून आपण काही मिनिटांत खाली येतो.

इंटरलाकन हे पाहण्याजोगे आहे. येथील आल्पस पर्वतरांगामधील जुंगफ्राउ हे स्थळ पाहण्यासारखे आहे. युरोपमधील सर्वांत उंच म्हणूनही याची ख्याती आहे. सुमारे ११ हजार ३३३ फुट एवढ्या उंचीवर जायचे म्हटले तर अंगावर काठा उभा राहतो पण, येथे जाण्यासाठीही आरामदायक रेल्वे आहे आणि निसर्गसौंदर्य पाहताना आपण याठिकाणी कधी पोहोचलो तेच समजत नाही. इंटरलाकनपासून 'जुंगफ्राउ'हा सुमारे अडीज तासांचा प्रवास आहे. पण, शेवटचा तासभरच्या प्रवासात रेल्वे बर्फाच्छादित पर्वतांतून धावत असते, हा नजारा शब्दात व्यक्त करता न येणारा आहे.

जुंगफ्राउ पीकवर 'व्हू पॉईंट्स' आहेत. येथील स्फींक्स ऑब्जर्वेशन हॉल आणि टेरेस पाहताना आपण थक्क होऊन जातो. आईस पॅलेसही पाहण्यासारखा आहे. जिकडे बघाल तिकडे बर्फाने व्यापून टाकलेला परिसर, सुर्यकिरणे पडतात चकाकून जाणारी शिखरे, त्यामध्ये स्कीइंग करताना मुंग्यांसाखरे दिसणारे लोक पाहताना वेगळीच मजा येते. खरोखरच येथून पायच निघत नाही. उंचीवर बॉलीवूड रेस्टॉरंट आहे. याठिकाणी भारतीय पदार्थांचा आस्वाद घेतानाचा अनुभवही काही औरच आहे. भारतीयांबरोबरच युरोपीय लोकही या भोजनाचा आस्वाद घेताना दिसतात.

इंटरलाकन पासून मॉंत्रोला जाता येते. या तीन तासांच्या प्रवासासाठी पारदर्शत रेल्वे आहे. या पेनोरेमिक ट्रेनमधून प्रवास करण्याचा अनुभही सुखद आहे. मॉंत्रोमधील जिनेवा लेक प्रसिद्ध आहे. याला स्विस रिविएराही म्हटले जाते. याठिकाणी जास्तकरून फ्रेंच बोलली जाते. येथील ओल्ड टॉउन फ्रेंडी मर्क्युरी मेमोरियल, केसल चिलिया ही स्थळे पाहण्यासारखी आहेत. येथून 'चॉकलेट ट्रेन' आपल्याला ग्रुएरला घेऊन जाते. येथील गावांमध्ये चीज बनविले जाते. म्हणूनच याला चीज मेकिंग टाउनही म्हटले जाते. याच मार्गावर येणाऱ्या 'ब्रोक' येथे जगविख्यात नेस्लेची चॉकलेट फॅक्टरी आहे.






# तुमचा प्रवास बनवा आठवणीतील

चांगल्या जीवनासाठी फिरायला आणि पर्यटनाला जाणे खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे आपल्या जीवनात नवीन उत्साह, आशा जागी होते आणि जीवनात प्रसन्नता येते, पण सध्याच्या व्यस्त आयुष्यात सहली, पर्यटन आणि फिरायला सहसा शक्य होत नाही, तर मग आपल्या जीवनात प्रसन्नता का निर्माण करू नये.

आजकालच्या तणावपूर्ण आणि व्यस्त आयुष्यात सहली आणि फिरायला जाणे संपत चालले आहे. जीवन फक्त घर आणि ऑफिसच्या जबाबदाऱ्या व बस-ट्रेनमधील घाई गडबडीपर्यंत मर्यादित होत आहे. अशा परिस्थितीत सहल व पर्यटनाला जाणेही एक डोकेदुखी वाटते, पण खऱ्या पर्यटनाचा आनंद तेव्हाच मिळतो जेव्हा पर्यटन पूर्ण तन्मयतेने आणि कोणत्याही तणावाशिवाय पार पडते. प्रवास म्हणजे फक्त बस, रेल्वे, टॅक्सी किंवा विमानाने जाणे नव्हे, तर आपल्या दिनचर्येला आयुष्यापासून वेगळे करणारी जवळची शतपावलीदेखील एक चांगला प्रवास म्हटला जाऊ शकतो. यासाठी काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे.

कधीही मानत नसताना फिरायला जाऊन नये. इच्छा असेल तेव्हाच आरि मन पूर्णत: तयार करून प्रवासाला निघावे.

कोणतेही काम अपूर्ण ठेवून प्रवासाला जाऊ नये. घर किंवा ऑफिसच्या जबाबदाऱ्या पूर्ण करूनच बाहेर पडण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून मन ऑफिसमध्ये गुंतू नये.

पर्यटनासाठी रोमांचक स्थळ निवडावे जे तुमच्यासाठी पूर्णत: नवीन असेल.

प्रवासासाठी निघताना शक्यतो सायंकाळची वेळ निवडावी ज्यामुळे बस, रेल्वे किंवा जहाजात नवीन रात्र घालवण्याची संधी मिळेल.

शक्य असल्यास सोबत लग्नाचा अल्बम किंवा संस्मरणीय फोटो ठेवावेत. वेळ मिळाल्यास हे फोटो पाहावे. यामुळे फक्त गोड आठवणीच जाग्या होणार नाहीत, तर धकाधकीच्या आयुष्यात विस्मरणात गेलेले प्रेमही जागे होईल.

एकमेकांना त्रास होईल आणि रंगाचा बेरंग होईल असे काम किंवा नावाचा उल्लेख येऊ देऊ नये. संधी मिळेल तेव्हा एकमेकांचे कौतुक करावे आणि असे क्षण कॅमेऱ्यात कैद करावेत जेणेकरून नंतरही कधी ते पाहिल्यास दिलासा मिळू शकेल.

नेहमीच्या आयुष्यात आपण जी गोष्ट करणे टाळतो ती प्रवासाला किंवा पर्यटनाला गेल्यानंतर निश्चित करून पाहावी.


स्वत:ला नवीन लूक किंवा आत्मविश्वास देणारे नवीन कपडे प्रवासादरम्यान घालावेत. विचार करा – पार करण्यासाठी आयुष्याक अडचणीच नसतील, तर माणसाच्या समृद्ध अनुभवाची माजच निघून जाईल. खल दऱ्याच नसतील, तर उंच शिखरावर घालवलेले क्षण कधीही अद्भुत वाटणार नाहीत



# ट्रेकर्ससाठी कुल्लु आयडियल

बियास नदीचया पात्रात उत्तरेकडून दक्षिणेकडे ८० कि.मी. लांब परिसरात हे खोरं वसलयं. गिर्यारोहक, पर्यटकांसाठी ते एक आव्हानच ठरतं. स्थानिक विणकरांकडून बनवलेल्या रंगीबेरंगी शाली आणि टोप्यांसाठी कुल्लू प्रसिद्ध आहे. इथूनच १५ किलोमीटर अंतरावर विश्वेश्वर महादेवाचं मंदिर आहे. हे आठव्या शतकात बांधलं गेलेलं आहे. याशिवाय कुल्लू शहर मासेमारी आणि शिकारीसाठीही प्रसिद्ध ठिकाण आहे.


कुटुंबासह, मित्रांच्या गोतावळ्यासह येते भटकंतीसाठी यावंच, पण ट्रेकर्ससाठीही हा प्रदेश आयडियल आहे. ट्रेकिंग, रॉक क्लायबिंग, रिव्हर्स क्रॉसिंग याचा मनसोक्त आनंद घ्यायचा असेल तर कुल्लू-मनालीला यावंच. पूर्वी कुल्लू कुलंथपीठा या नावानं ओळखलं जायचं. कुल्लू दसरा या सणासाठी लोकप्रिय आहे. दसऱ्यादरम्यान इथे नृत्य, संगीत, देवदेवतांच्या पालख्या अशी धमाल असते. कुल्लूच्या शाली आणि कॅप आवर्जून खरेदी कराव्या. दिल्लीवरून पठाणकोट मार्गे कुल्लू ७६० कि.मी. अंतरावर आहे.




# भारताचे स्वित्झलँड खज्जियार

खज्जियार भारताचे स्वित्झलँड म्हणतात. येथे छान नैसर्गिक लॉन आहे. मध्ये तळे आहे आणि समोर मोठा डोंगर आणि जंगल आहे. येथे मैदानात बरेच खेळ आणि घोडेवाले असतात. या ठिकाणाहून घोड्याने चंबा गावात जाता येतो.

रावी नदीच्या किनारी हे गाव वसले आहे. येथे ४ देवळांचा एक समूह आहे. त्यातिल एक मंदिर लक्ष्मी नारायण मंदिर १०व्या शकतातील आहे. मंदिरांवर सुंदर कोरीव काम आहे. रावी नदी अतिशय सुंदर आणि स्वच्छ आहे. याठिकाणी कोई मिल गया ह्या चित्रपटाचे चित्रिकरण झाले आहे.



# कनकदुर्ग-गोवागड



हर्णे बंदर प्राचिन काळापासून प्रसिध्द आहे. सुवर्णदुर्ग या जलदुर्गामुळे हर्णे बंदराला ऐतिहासीक महत्वही प्राप्त झालेले आहे. सुवर्णदुग किल्ल्याच्या रक्षणासाठी हर्णेच्या सागरी किनाऱ्यावर तीन किनारी किल्ल्यांची उभारणी करण्यात आलेली आहे. ते तीन दुर्ग म्हणजे कनकदुर्ग, फत्तेदुर्ग आणि गोवागड हे होय.

हर्णे बंदर दापोली तालुक्यामधे असून तो रत्नागिरी जिल्ह्यामधे आहे. कोकणामधील महाड, मंडणगड आणि खेड कडून गाडीमार्गाने दापोलीला पोहोचता येते. दापोलीपासून सोळा कि.मी. अंतरावर हर्णे आहे. हर्णेच्या सागरातील सुवर्णदुर्ग किल्ल्याबरोबर किनाऱ्यावरील या तिन्ही किल्ल्यांनाही भेट देता येते.

हर्णेच्या किनाऱ्यावर दक्षिणेकडे टेकडीवजा एक भुशिर घुसलेले आहे. या लहानश्या टेकडीवजा भुशिरावर कनकदुर्गचा किल्ला उभा आहे. कनकदुर्गाच्या पुर्व बाजुला मच्छिमारांच्या असंख्य नौका दिसतात. या नौकांमधे जाण्यासाठी कनकदुर्गाला लागुनच धक्का बांधलेला आहे. या धक्क्यावर जाण्यासाठी पुलासारखा रस्ता केलेला आहे. या रस्त्यावर चालत गेल्यावर कनकदुर्गाच्यावर जाण्यासाठी केलेल्या पायऱ्यांचा मार्ग आहे. या पायऱ्यांच्या बाजुलाच भक्कम बांधणीचा बुरुज आहे. काळ्या पाषाणातील हा बुरुज म्हणजे कनकदुर्ग... हा पुर्वी किल्ला होता याचा साक्षीदार आहे. पायऱ्यांच्या मार्गाने आपण पाचच मिनिटांमधे कनकदुर्गावर पोहोचतो. गडाच्य माथ्यावरच्या इमारती आता नष्ट झाल्याअसून त्याभागात दिपगृह उभे असलेले दिसते. कनकदुर्गावरुन मुरुड दाभोळ तसेच गोपाळगडापर्यंतचा सागरकिनारा दिसतो. पश्चिमेकडे अथांग सागराची मधुन मधुन चमचमनारी किनार आणि सागराची गाज आपल्या मनाला धडकी भरवत रहाते. या पार्श्वभूमीवर दिमाखात उभा असलेला फुलपाखराच्या आकाराचा सुवर्णदुर्ग आपले लक्ष वेधून घेतो. उत्तरेकडै फत्तेदुर्गाची टेकडी मच्छिमारांच्या वस्तीने पुर्णपणे घेरलेली दिसते. कनकदुर्गावरील गडपणाचे अवशेष काळाच्या ओघात नष्ट झाल्यामुळे आपली गडफेरी १५ ते २० मिनिटांमधे आवरते.

कनकदुर्गाकडून परत फिरल्यावर डावीकडील टेकडी म्हणजे फत्तेदुर्ग असल्याची मनाची समजूत घालून पुढे निघावे लागते. मच्छिमारांच्या वस्तीने व्यापलेल्या फत्तेदुर्गावरचे अवशेष केव्हाच लुप्त झालेले आहे.

फत्तेदुर्गापासून फर्लांगभर गाडीरस्त्याने चालत आल्यावर समोर दिसतो तो तटबंदीने युक्त असलेला गोवागड. भक्कम तटबंदी आणि भक्कम दरवाजा असलेल्या या किल्ल्याचे नाव जरी गोवागड असले तरी गोव्याशी याचा काही संबंध नाही. रस्त्याच्या कडेलाच याचा दरवाजा दिसतो पण याचा मुख्यदरवाजा मात्र उत्तरेकडे तोंड करुन आहे. हे भव्य प्रवेशव्दार पहाण्यासाठी तटबंदीला वळून समोरुन आपल्याला जावे लागते. सागराच्या बाजुला थोडेसे उतरुन डावीकडे वळाल्यावर आतल्या बाजुला हे प्रवेशव्दार आहे. हे प्रवेशव्दार दगडाने चिणून बंद करण्यात आले आहे. प्रवेशव्दाराजवळ हनुमानाची मुर्ती आहे. तसेच येथे शरभ व महाराष्ट्रामधे किल्यांवर अभावानेच दिसणारे गंडभेरुडाचे शिल्प आहे. हे प्रवेशव्दार पाहून पुन्हा रस्त्यावर येवून नव्याने केलेल्या कमानीवजा दारातून गडामधे प्रवेश करावा लागतो. सध्या कोणा हॉटेल व्यवसायीकाने गडाचा ताबा घेतला आहे. त्याने दारावर चौकीही उभारली आहे. तेथील रखवालदाराची परवानगी घेवून किल्ल्यामधे जाता येते. गोवागड दक्षिणकडील भाग थोड्या चढाचा आहे. याचाच उपयोग करुन त्याला तटबंदी घालून बालेकिल्ला केलेला आहे. पश्चिमेकडील तटबंदी काहीशी ढासळलेली आहे. पश्चिमबाजुला सुवर्णदुर्गाचे दृष्य उत्तम दिसते. गडामधे पाण्याची विहीर आहे. तिचा वापर नसल्यामुळे पाणी वापरण्यायोग्य राहीले नाही. किल्ल्यात इंग्रजकालीन दोन इमारती पडलेल्या अवस्थमधे आहेत. त्यामधील एकात पुर्वी कलेक्टर राहात असे. गडामधे महत्त्वाचे असे बांधकाम फारसे शिल्लक नसल्यामुळे गड पहाण्यासाठी अर्धा तास पुरेसा होतो.

जर आपण संध्याकाळच्या वेळेस येथे असू तर कनकदुर्गच्या किनाऱ्यावरील मासळी बाजार अवश्य पहाण्याजोगा आहे. अर्थात खवय्यासाठीतर ही सुवर्णसंधीच होय.

# भाजपचे दरवाजे सर्वांसाठी खुले

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :



भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरूवारी नाशिकमध्ये बोलताना पक्षवाढीसाठी आपल्या पक्षाची कवाडे सर्वांसाठी खुली असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेल्या सुधाकर बडगुजरांसाठी भाजपने अवघ्या २४ तासांतच आपले दरवाजे खुले केल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक १५ ऑगस्टला लागेल, असा अंदाजही बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

ठाकरे गटाने पक्षविरोधी कारवाया केल्याचा ठपका ठेवत बुधवारी सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी केली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देण्याचे संकेत दिलेत.

तत्पूर्वी स्वतः बडगुजर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपण भाजपच्या वाटेवर असल्याचे स्पष्ट केले होते. पण बडगुजर यांना पक्षात घेण्यास भाजपच्या स्थानिक नेत्यांनी विरोध केला होता. पण आता बावनकुळे यांनी स्वतःच बडगुजर यांना पक्षात घेण्यास ग्रीन सिग्नल दिला आहे.

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशाविषयी गिरीश महाजन लक्ष घालत आहेत. पक्षवाढीसाठी आमची कवाडे सर्वांसाठी खुली आहेत, असे बावनकुळे यांनी याविषयी बोलताना स्पष्ट केले.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी नेत्यांच्या मागे-पुढे फिरणाऱ्यांना तिकीट मिळणार नसल्याचेही ठणकावून सांगितले. नेत्यांच्या मागे-पुढे करणाऱ्या महापालिका निवडणुकीत तिकीट मिळणार नाही. त्यामुळे कुणीही नेत्यांपुढे चमकोगिरी करू नये. भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मागील ११ वर्षांत मोदी सरकारने केलेल्या कामांची उजळणी करून ती जनतेपर्यंत पोहोचवायची आहेत.

आगामी निवडणुकांत आपल्याला एकेक मत महत्वाचे आहे. त्यामुळे कमळ चिन्हावर लढणाऱ्या एकाही कार्यकर्त्याला आपल्याला हरू द्यायचे नाही. सर्वांनी असा संकल्प घेतला पाहिजे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने लाडकी बहीण, शेतकरी वीज बिल माफीसारखे निर्णय घेतले होते. आता १५ ऑगस्टला स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लागेल. त्यामुळे आपल्याला अधिक प्रयत्न करावे लागतील, असे ते म्हणाले.

## बडगुजरांच्या प्रवेशाला सीमा हिरेंचा विरोध

दुसरीकडे, सुधाकर बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाला नाशिक पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरे यांनी कडाडून विरोध केला आहे. सुधाकर बडगुजर भाजपमध्ये प्रवेशासाठी इच्छुक असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. पण यासंबंधी आमच्याशी कोणतीही चर्चा किंवा विचारणा झाली नाही. मी स्वतः बडगुजर यांच्या विरोधात दोनदा निवडणूक लढवली. त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला. आमच्या वरिष्ठ नेत्यांवर आक्षेपार्ह टीका केली. खुद्द चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविषयी त्यांनी चुकीची माहिती पसरवली होती. एवढेच नाही तर नारायण राणे यांच्यावर त्यांनी अटक होईल अशी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे अशा व्यक्तीस पक्षात प्रवेश देऊ नये अशी आमची भूमिका आहे. बडगुजर यांच्यावर सध्या १७ गुन्हे दाखल आहेत. त्यांचे अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीमचा हस्तक सलीम कुत्ता याच्याशीही संबंध असल्याची माहिती आहे. त्यांच्या मुलावरही गोळीबाराचा गुन्हा दाखल आहे. या सर्व प्रकरणांमधून स्वतःची सुटका करण्यासाठी ते भाजपमध्ये येण्याचा प्रयत्न करत असावेत, असे त्यांनी म्हटले आहे.

# बफर झोनमधील गावांमध्ये एआय कॅमेरे बसवणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी तसेच वन्य प्राण्यांच्या हल्ल्यापासून ग्रामस्थांना वाचविण्यासाठी वन्य प्राण्यांचा वावर आहे, अशा महाराष्ट्रातील वनालगतच्या बफर झोनमधील गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर असणारे कॅमेरे लावण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी येथे दिली.

चंद्रपूर येथे आयोजित महिला परिषदेला उपस्थित राहाण्यासाठी आले असता ते माध्यमांशी बोलत होते. मानव व वन्यजीव यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये, अशा घटनांमध्ये माणसांचा मृत्यू होऊ नये, यासाठी ठोस पावले उचलण्यात येईल, असेही ते म्हणाले.

वनालगतच्या गावांमध्ये फेन्सिंग करणे, चर खोदणे याबरोबरच वन्य प्राणांची माहिती गावकऱ्यांना कळावी, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल. यासाठी यासाठी कॅम्पा वन्यजीव निधी तसेच गरज पडल्यास मॅनग्रोजमधील निधी वापरला जाईल, असे नाईक यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील जंगलांमध्ये वन्य प्राण्यांची संख्या वाढत असल्यामुळे मानव व वन्यजीव संघर्ष होत आहेत. जंगलातील प्राणी संख्या नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे. संध्याकाळी साडेसातशे सकाळी साडेसात पर्यंत तो काळ महत्त्वाचा असतो. लोकांमध्ये जागृती व्हावी सोलर फेंसिंग लावण्यात येईल. यासह अनेक उपाययोजना केल्या जातील.



नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यात नेऊरवाडा गावात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. रवी कवडू कालसर्पे (वय ३८) हे शेतात काम करत असताना वाघाने हल्ला केला. वन विभागाचे अधिकारी सातत्याने काम करीत होते. पण, समज, गैरसमज पसरवले जातात.

विभागाचे अधिकारी कोणाला सांगत नसतात. आम्ही आमचे प्रयत्न करीत असतो, असे नाईक म्हणाले. चंद्रपूरसह इतर ठिकाणी बफरमध्ये पर्यटक वाघ पाहण्यासाठी रस्त्यावर उतरत आहे. वन विभागासह प्रत्येक विभागात आम्ही मायक्रो लेव्हलवर बदल करीत आहो. त्यातून निश्चितपणे चांगले बदल होतील. यात जनतेचाही सहभाग लागेल असे ते म्हणाले.

# माजी आमदार सानंदांचे अखेर ठरले!

## दादांच्या राष्ट्रवादीत घेणार प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ५ :



खामगावचे माजी आमदार काँग्रेस सोडण्याच्या दीर्घ चर्चेला अखेर त्यांनीच पूर्णविराम दिला आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघांचे तब्बल तीनवेळा काँग्रेसचे आमदार राहिलेले ज्येष्ठ नेते दिलीपकुमार सानंदा यांनी अखेर पक्षाला रामराम ठोकला आहे.

येत्या १२ जून रोजी दिलीप कुमार सानंदा हे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून हाताला घड्याळ बांधणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

मागील काही महिन्यांपासून सानंदा हे काँग्रेस सोडणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. ते कोणत्या पक्षात जाणार याबद्धल उत्सुकता होती. मध्यंतरी त्यांनी किमान दोनवेळा शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. अलीकडे बुलढाणा दौऱ्यावर आलेले शिंदे यांची त्यांनी आमदार गायकवाड यांच्या फार्म हाऊस वर भेट घेतली. मात्र संभाव्य सेना प्रवेश टळला. भाजप प्रामुख्याने खामगावचे आमदार आकाश फुंडकर यांचा कडवा विरोध असल्याने हे डावपेच फसले. मात्र काँग्रेस सोडण्याचा निर्धार पक्का असल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी संपर्क साधला.

एक महिन्यापूर्वी त्यांच्या ताब्यातील खामगाव बाजार समिती मधील काही संचालकानी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. यामुळे ते लवकरच हातात घड्याळ बांधणार हे स्पष्ट झाले. स्वतः सानंदा यांनी प्रसिद्धी माध्यमाशी बोलतांना यावर शिक्कामोर्तब केले. तसेच काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनाम्याच्या माहिती दिली.

मागील चार दशकांच्या राजकारणात सांनदा यांनी क्रियाशील सदस्य ते तीनवेळा आमदार अशी मजल मारली. मतदारसंघात कोणतेही नेतृत्व निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली. खामगाव मतदारसंघात काँग्रेस म्हणजे सानंदा असे समीकरण तयार झाले. गेली चार दशके ते काँग्रेसच्या कार्यात सक्रिय होते. पक्षनिष्ठा राखून त्यांनी संघटन बळकट करण्यासाठी तन-मन-धनाने योगदान दिले होते. पक्षानेही त्यांना विविध जबाबदाऱ्या देऊन गौरवले होते, असे त्यांनी आपल्या राजीनाम्यात नमूद केले आहे.

मात्र, गेल्या काही काळात पक्षातील अंतर्गत गटबाजी, दुर्लक्ष आणि अनुशासनहीनतेमुळे सानंदा नाराज होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी पक्षाच्या सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला असून, तो तात्काळ स्वीकारावा, अशी विनंती त्यांनी आपल्या पत्रात केली आहे. राजीनामा दिला असून, त्यांनी अधिकृतपणे याची माहिती प्रसिद्धी माध्यमांना दिली. त्यांच्या पाठोपाठ खामगाव मतदारसंघातील अनेक काँग्रेस पदाधिकारी राजीनामा देणार असल्याचे समजते.

# अदानीला २१ एकर जागा देता यावी म्हणूनच अटी शिथिल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

**वडेट्टीवार यांचा आरोप**

मुंबईतील धारावी प्रकल्पासाठी अदानी समूहाला मुंबईतील जमिनीची खैरात वाटण्यात येत आहे. धारावी पुनर्वसनाचे नाव पुढे करून मोक्याच्या जागा या उद्योग समूहाला देण्याचे काम सरकार करत आहे.

या मोक्याच्या ठिकाणी टॉवर उभे केले जाणार, पण धारावीकरांसाठी जमीन दिल्याचे सरकार सांगत आहे हे खोटे आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. हे सरकार अदानी उद्योग समूहासाठी महाराष्ट्राला उध्वस्त करत असल्याची टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

कुर्ला येथील २१ एकर जागा ही अदानी उद्योगसमूहाला राज्य सरकारने देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी अटी शर्ती देखील शिथिल केल्या आहेत. संपूर्ण मुंबईतील अनेक महत्वाचे भूखंड हे या समूहाला देण्यात आले आहेत. अजून किती जमीन यांना देणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्र आणि मुंबईचे अदानी समूहाला गहाण ठेवली आहे का? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

देशात जनगणना होणार आहे, २०२७ पासून या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. यावेळी जातीनिहाय जनगणना देखील करण्यात येणार आहे. राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती, त्यानंतर सरकारने निर्णय घेतला आहे. आता सरकारने २०२७ मध्ये जनगणनेची प्रक्रिया सुरू करणार ही घोषणा केली आहे. निवडणुकीत ओबीसी समाजाची मत घ्यायची पण त्यांच्याकडे भाजप दुर्लक्ष करते. २०२९ निवडणुकीला समोर ठेवून जुमलेबाजी करू नये. जातीनिहाय जनगणना सरकारने याचवर्षी ती प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

# नागपुरात नवविवाहितेची आत्महत्या

## लग्नाच्या ३५ दिवसांनंतर तरुणीने संपवले जीवन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण अजूनही ताजे असताना नागपूरमध्येही अशीच हुंडाबळीची घटना घडली. बुटीबोरी परिसरात सासरच्यांकडून होणाऱ्या मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून एका नवविवाहितेने आत्महत्या केली. मयुरी ठाकरे डाहुले (वय २६) हिने राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. अवघ्या ३५ दिवसांपूर्वी म्हणजेच २५ एप्रिल २०२५ रोजी तिचा विवाह अभिषेक डाहुले याच्याशी मोठ्या थाटामाटात पार पडला होता.

विवाहानंतर काहीच दिवसांत सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांनी सतत पैशांसाठी मयुरीवर दबाव टाकण्यास सुरुवात केली. नवरा अभिषेक डाहुले यानेही या छळाला पाठिंबा दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

शारीरिक आणि मानसिक छळामुळे मयुरी अत्यंत तणावात होती. काही दिवसांत परिस्थिती सुधारेल असे वाटल्याने तिने सुरुवातीला तिला होत असलेल्या त्रासाची माहिती वडिलांना दिली नव्हती. मात्र, छळ न थांबल्यामुळे तिने आपल्या वडिलांना सर्व प्रकार सांगितला. वडिलांनी मदतीचा हात पुढे करत गटाच्या भीशीतील २० हजार रुपये सासरच्या मंडळींना दिले, मात्र त्यानंतरही छळ थांबला नाही. छळाला कंटाळून मयुरीने गळफास घेऊन जीवन संपवले. मयुरीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती अभिषेक डाहुले, सासू कुसुम डाहुले, सासरे दीपक डाहुले आणि दीर आदित्य डाहुले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

: सिनेरंग :

# अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा नवा घोटाळा!




**लोकरंजन**

मराठी प्रेक्षकांची मने जिंकणारी सुपरहिट फ्रँचायझी ये रे ये रे पैसा पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे. धमाल विनोद, कमाल कथा आणि एकाहून एक भन्नाट पात्रे घेऊन ये रे ये रे पैसा ३ येत्या १८ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून यात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांचा कूल अंदाज पाहायला मिळत आहे.

चित्रपटाच्या टीझरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळत असतानाच आता या नवीन पोस्टरने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. या फ्रँचायझीने नेहमीच प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन केले आहे. त्यामुळे यंदा हे मनोरंजन तिप्पट होणार हे नक्की.

ये रे ये रे पैसा ३ मध्ये कॉमेडीचा ट्रिपल धमाका असून एका नव्या मोठ्या गोंधळाची धमाल कहाणी उलगडणार आहे. यावेळी पाच कोटींचा आर्थिक घोटाळा आणि ते सुटवण्याच्या प्रयत्नात अण्णा, आदित्य, बबली आणि सनी यांच्यासोबत घडणाऱ्या भन्नाट घटना पाहाणे रंजक ठरेल. या चित्रपटाचे वैशिष्ट्य म्हणजे धर्मा प्रॉडक्शन्स प्रस्तुत अमेय विनोद खोपकर पिक्चर्स, उदाहरणार्थ निर्मित, न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स यांनी चित्रपटाची निर्मिती केली असून वर्डविझार्ड एंटरटेनमेंट यांनी सहनिर्मिती केली आहे.

तसेच सुधीर कोलते, ओमप्रकाश भट्ट, नासीर शरीफ, ओंकार सुषमा माने, स्वाती खोपकर, निनाद नंदकुमार बत्तीन, गिरीधर गोपाळकृष्ण धुमाळ हे निर्माते व सौरभ लालवाणी सहनिमार्ते आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन संजय जाधव यांनी केले असून या चित्रपटात संजय नार्वेकर, सिद्धार्थ जाधव, उमेश कामत, तेजस्विनी पंडित, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही कलाकार प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

■ ■ ■

स्टार प्लस या वाहिनीवर प्रेक्षकांना नवा आस्वाद घेता येईल, असा एक नवा कार्यक्रम लवकरच सादर होणार आहे. प्रसिद्ध यू ट्यूबर आणि आपल्या पदार्थांनी घरगुती स्वयंपाकाच्या बाबतीत एक नवी हलचल निर्माण करणाऱ्या निशा मधुलिका स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर पदार्पण करत आहेत! त्यांचा लाघवी स्वभाव, वागण्या-बोलण्यातील नम्रता, सोप्या पाककृती आणि प्रेक्षकांना आपलेसे करण्याची त्यांची वृत्ती याकरता नावजलेल्या निशा मधुलिका यांनी यू ट्यूबवर १ कोटी २० लाखांहून अधिक सदस्यांचा एक निष्ठावंत समुदाय निर्माण केला आहे.




## स्टार प्लसद्वारे छोट्या पडद्यावर निशा मधुलिका यांचे पदार्पण

शाकाहारी पाककृतींचा एकेक टप्पा निगुतीने आणि अत्यंत सोप्या पद्धतीने सांगण्याच्या त्यांच्या हातोटीमुळे निशा मधुलिका आजच्या घडीला देशातील सर्वात आवडत्या पाककृती विषेशज्ञ बनल्या आहेत.

प्रामुख्याने, गृहिणी आणि खाद्यप्रेमींचा मोठा प्रतिसाद त्यांना लाभत आहे. आता त्यांची जादू छोट्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. स्टार प्लस वाहिनीवरील लोकप्रिय पात्रांसह स्टार प्लसच्या मालिकांमध्ये त्या आता सहभागी होत आहेत. तेंव्हा दर सोमवारी संध्याकाळी ६:१५ वाजता फक्त स्टार प्लसवर निशा मधुलिका यांना तुमच्या दूरचित्रवाणीवर स्वयंपाक करताना पाहण्यासाठी सज्ज व्हा!

■ ■ ■



## 'कप बशी' या आगामी चित्रपटात दिसणार पूजा सावंत, ऋषी मनोहर ही फ्रेश जोडी

नवनवे प्रयोग, नव्या कल्पना मराठी चित्रपटसृष्टीत होत असतात. आता आगामी कप बशी या चित्रपटांतून पूजा सावंत आणि ऋषी मनोहर ही नवी जोडी प्रेक्षकांसमोर येणार आहे. अत्यंत मजेशीर, मनोरंजक अशी कहाणी या चित्रपटातून उलगडणार असून सध्या मुंबई येथे या चित्रपटाचे चित्रिकरण सुरु आहे.

₹कप बशी₹ या चित्रपटाची निर्मिती सुकल्प चित्र या निर्मिती संस्थेच्या कल्पक सदानंद जोशी यांची असून निर्माता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट असला, तरी त्यांचं चित्रपटसृष्टीशी असलेलं नातं जुनंच आहे.

त्यांचे वडील सदानंद जोशी यांनी १९९६ साली प्रदर्शित झालेल्या पुत्रवती या चित्रपटासाठी कथा, पटकथा, गीतलेखन आणि निर्मिती अशा सर्वच बाजूंवर काम केलं होतं. त्या चित्रपटानं राष्ट्रीय, राज्यस्तरीय १४ पुरस्कारांनी गौरवला गेला होता. त्यामुळे वडिलांचं प्रेरणादायी काम आणि त्यांचा कलात्मक वारसा आता कप बशी या चित्रपटातून ते पुढे आणत आहेत. वैभव चिंचाळकर हे टीव्ही मालिका, नाटक, मराठी चित्रपटातलं सुपरिचित नाव आहे. वैभव यांनी कन्यादान, नकुशी, शुभमंगल ऑनलाइन, पुढचं पाऊल अशा अनेक गाजलेल्या मालिका, पुष्पक विमान या चित्रपटसाठी दिग्दर्शन केले होते.

पूजा सावंतनं अनेक मराठी, हिंदी चित्रपटांत उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं आहे. तर ऋषि मनोहरनं टीव्ही मालिका, नाटक, चित्रपटांतून स्वतःला अभिनेता म्हणून सिद्ध केलं आहे. त्यामुळे या दोघांची फ्रेश जोडी मोठ्या पडद्यावर किती खुलून दिसते याचं कुतुहल आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबीकडे सादर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ५ :

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्याविरोधातील कथित कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबी अर्थात अँटी करप्शन ब्यूरोला दिले. तसेच या पुराव्यांमुळे आता धनंजय मुंडे वाचणार नाहीत असा ठाम दावाही केला.

त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. अंजली दमानिया यांनी काही महिन्यांपूर्वी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यानंतर एसीबीने त्यांना या आरोपांचे पुरावे देण्याचा समन्स बजावला होता.

त्यानुसार, दमानिया यांनी बुधवारी अँटी करप्शन ब्यूरोच्या येथील कार्यालयाला भेट देऊन धनंजय मुंडे यांच्याविरोधातील पुरावे दाखल केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी योग्य कारवाई झाली तर धनंजय मुंडे वाचणार नाहीत असे अंजली दमानिया म्हणाल्या.

# राज्यमंत्र्यांना किरकोळ अधिकार थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ५ :



अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ (अजित पवार गट) आणि त्याच खात्याचे राज्यमंत्री योगेश कदम (शिंदे गट) यांच्यातील संघर्ष वाढला आहे. कदम यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याविरुद्ध तक्रार केली आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे किरकोळ अधिकार देण्यात आल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे आणि तोंडी अधिकार स्वीकारण्यास नकारही दिला आहे.

महायुती सरकारच्या दोन मंत्र्यांमधील अंतर्गत संघर्षाची चर्चा सध्या संपूर्ण मंत्रालयात चर्चेचा विषय बनली आहे. एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात राज्यमंत्र्यांना जे अधिकार देण्यात आले होते तेच अधिकार आताही सर्व राज्यमंत्र्यांना देण्यात यावेत, अशी विनंती कदम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लेखी स्वरूपात केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

कदम यांच्याकडे गृह (शहरे), महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन विभागांची जबाबदारी आहे. गृहमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अवघ्या १० दिवसांत फडणवीसांनी त्यांना राज्यमंत्रिपदाचे अधिकार बहाल केले.

परंतु महसूल, ग्रामविकास आणि पंचायतराज आणि अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणाशी संबंधित राज्यमंत्र्यांना दिले जाणारे अधिकार त्यांना अद्याप देण्यात आलेले नाहीत. मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाशी संबंधित अतिशय किरकोळ अधिकार दिले, असे त्यांचे म्हणणे आहे. हे प्रकरण तापण्याचे संकेत आहेत.

# झेपणार नव्हती तर आश्वासने लादली कशाला?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर बच्चू कडू यांनी सरकारविरोधी भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्र्यांविरोधात एक व्यंगचित्र तयार करून थेट सरकारला प्रश्न विचारले आहेत.

कर्जमाफीच्या मुद्द्यावरून बच्चू कडू यांनी सरकारला घेरण्याचे योजिले आहे. अजित पवार यांनी आपण कुठेही कर्जमाफीसंदर्भात बोललो नसल्याचे वक्तव्य केले आहे. यावर भाष्य करताना कडूंनी भाजप हा राष्ट्रवादीचा बाप असल्याचा टोला लगावला होता. तर पुढील महिन्यापासून त्यांनी आंदोलन छेडणार असल्याची घोषणा केली आहे.

बच्चू कडू यांच्या पक्षाकडून एक कार्टून व्हायरल केले जात आहे. ज्यामध्ये कडू यांनी मुख्यमंत्र्यांवर प्रहार केला आहे, तसेच निवडणुकीत दिलेल्या घोषणांवर प्रश्न केलेला आहे. हे कार्टून सर्वत्र चर्चेचा विषय ठरलेला आहे.

बच्चू कडू यांच्या कार्टूनमधून शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी देणार, ७२ हजार रोजगारांची कधी निर्मिती होणार, दिव्यांगला न्याय कधी मिळणार, शेतकऱ्यांचे प्रश्न कधी सुटणार, असे अनेक प्रश्न या व्यंगचित्राच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच झेपणार नव्हते तर खोटे आश्वासन दिले कशाला? असा प्रश्नही केला आहे. या कार्टूनला कडू सवाल असे नाव देण्यात आले आहे.




### ७ जुलैपासून मोझरी येथे आमरण उपोषण

अजित पवारांच्या घरासमोरील आंदोलनानंतर बच्चू कडू पुढे टप्प्याटप्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी कर्जमाफीच्या मुद्द्यावर नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलनाची घोषणा त्यांनी केली आहे.

कर्जमाफीच्या मुद्द्यावर ७ जुलैपासून तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी किंवा आपलं जन्मगाव असलेल्या कुरळपूर्णा येथे आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

महासागर PALGHAR
RNI No.: MAHAMAR/2014/62313
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 208/B, Lokmanya Building, Near Taluka Panchayat Samiti Office, Palghar(W)-401404, **Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK, Executive Editor- Shashi Karpe**

महासागर पालघर
हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा जवळ, वैशाली नगर लास्ट बस स्टॉप, दहिसर ईस्ट, मुंबई- ४०००६८ येथे छापून २०८/बी, लोकमान्य बिल्डिंग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर पालघर (प.) ४०१४०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक : **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (मो. ९९२२९७००२३) कार्यकारी संपादक - शशी करपे (मो.नं. ९८९२९६८७२५) Email : mumbaimahasagar@gmail.com**
RNI No.: MAHAMAR/2014/62313